# छात्र प्रबोधन

सौर अग्रहायण, शके १९३३ । वर्ष १२ अंक ३

मूल्य रुपये पंधरा

ज्ञान प्रबोधिनीचे कुमारांसाठी, कृतिशीलता जोपासणारे मासिक !



# व्यवहारचातुर्य ?!

प्रसिद्ध जर्मन व्यंगचित्रकार इ. ओ. प्लाउएन यांच्या ‘वडील आणि मुलगा’ या मालिकेतील व्यंगचित्रे



E.O. Plauen यांच्या Vater und Sohn या व्यंगचित्रांच्या पुस्तकातून साभार

# छात्र प्रबोधन

**सौर अग्रहायण, शके १९३३। वर्ष १२ अंक ३**

(मासिकाचा प्रारंभ : सौर श्रावण शके १९१४ (जुलै - ऑगस्ट १९९२) २३३ वा अंक, वर्ष २० अंक ५

प्रकाशन दिनांक - १० अग्रहायण, शके १९३३/१ डिसेंबर २०११

# अंतरंग


२. **संवाद** - महेन्द्र सेठिया

३. **'छा. प्र.'मय** - प्रसाद सांडभोर, स्वच्छंद गंदगे

६. कविता पानोपानी... **वृक्षराया...** - शरद कुलकर्णी

७. उजळती वाट...- २ **युक्ताहार विहार** - वाच. स्वर्णलता भिशीकर

९. **माहितीतले खाणकाम** - वाच. शुभदा नगरकर

१२. वाचलेच पाहिजे असे काही... **कॉलनी** - नीलिमा करमरकर

१४. कथा... **वृक्षवल्ली आम्हा सोयरे...।।** - मेधा इनामदार

२१. प्रकल्पाची कमाल शिकण्यातली धमाल... ४
**प्रकल्पवृत्त नव्हे, प्रकल्पाचा आरसाच जणू** - विवेक पोंक्षे

२४. **चित्रगोष्टी - १** - चित्रा वैद्य

२६. कविता पानोपानी...
**माझी आई शिकलेली नव्हती...!** - प्रभाकर साळेगावकर

२७. कथा... **आम्रकूट** - म. वि. कोल्हटकर

३१. **दिवाळी २०११ : समृद्ध करणारे भांडार** - जयश्री काटीकर

**याशिवाय -** संस्कृत प्रहेलिका (२०), उदार दृष्टिकोन (३०)


**मुखपृष्ठाविषयी** - चित्रकार खिलचंद्र चौधरी यांचे 'जलरंग' हे चित्रकलेचे आवडते माध्यम आहे. त्यांची जलरंगातील संगीतकार-वादकांची, वेगवेगळ्या देवळांची तसेच महाबळेश्वर आणि माथेरान येथील निसर्गचित्रे प्रसिद्ध आहेत. मुखपृष्ठावरील चित्र त्यांच्या माथेरान येथील निसर्गचित्रांपैकी एक आहे. या चित्रात त्यांनी माथेरानमधल्या धुक्यानी लपेटलेल्या थंडीतील एका सकाळचे चित्रण केले आहे. (मूळ चाररंगी चित्र इथे कृष्णधवल स्वरूपात छापले आहे.)

**सौजन्य -** www.indiaart.com


**संपादक, प्रकाशक, मुद्रक**
महेन्द्र सेठिया

**कार्यकारी संपादक**
जयश्री काटीकर

**संपादक मंडळ**
शैलजा देशमुख
नीलिमा करमरकर
कांचनगंगा गंधे
आश्लेषा महाजन

**मुखपृष्ठ/मलपृष्ठ**
खिलचंद्र चौधरी/तेजस्वी भुरके

**आतील चित्रे**
अभय पुरंदरे, कुडलय्या हिरेमठ


ॐ

*इवली शल्ये रुपती खुपती*
*मात करू दे त्यांच्यावरती*
*प्रगल्भतेचे पंख देऊनी*
*ने ज्योतिर्जगतात*


**संपर्क पत्ता**
**छात्र प्रबोधन,** ज्ञान प्रबोधिनी,
५१०, सदाशिव पेठ, पुणे - 411030
☎ (०२०) २४२०७ १७४/१७९

**ई-मेल**
jpchhatra@rediffmail.com

**संकेतस्थळ**
www.chhatraprabodhan.org



**वार्षिक वर्गणी ₹ १८०/-**
**द्वैवार्षिक - ₹ ३४०/-**
**त्रैवार्षिक ₹ ५००/-**
**दशवार्षिक - ₹ १,५००/-**
**या अंकाची किंमत : ₹ १५**
पुण्याबाहेरील धनादेशासाठी ₹ २० जादा
घरपोच दिवाळी अंकासाठी
प्रतिवर्षी ₹ ४०जादा

## संवाद

***प्रिय प्रगतिवीर, सशक्त प्रबोधकांनो,***

*यावर्षी आपले दिवाळी अंक ४२ हजार घरांमध्ये पोहोचले बरं का! तुमचा वाचून झाला की नाही अंक? आपला दिवाळी अंक हा तुम्हाला समृद्ध बनवणारा अंक आहे, पण त्यासाठी तुम्ही तो मनापासून वाचायला हवा अन् त्याचा उपयोग स्वत:च्या विकासासाठी करून घ्यायला हवा. तो कसा करता येतो आणि करता येईल, या बद्दलचे २ लेख (पहिला आणि शेवटचा) या अंकात दिलेत. तुम्ही त्याआधारे दिवाळी व नित्य अंकांचा आणि त्यातील नावीन्यपूर्ण स्पर्धांचा उपयोग अधिक डोळसपणे आणि ठरवून कराल, असा विश्वास बाळगून आहे.*

*सहामाही परीक्षेचे गुण, प्रगतिपुस्तक एव्हाना मिळाले असेल ना? तुमच्यासाठी ते प्रगतिपुस्तक आहे की अधोगती पुस्तक? तुम्ही वर्गात कितवे आहात किंवा तुम्हाला किती गुण मिळालेत हे समजून घेण्यात खरं सांगायचं झालं तर मला फारसा रस नाही; पण मागच्या वर्षीच्या गुणांच्या तुलनेत तुम्ही कुठे आहात, हे मात्र समजून घ्यायला मला नक्कीच आवडेल. तुमच्यापैकी ज्यांची या निकषावर प्रगती झाली असेल (एकूणात किंवा वेगवेगळ्या विषयांत) त्यांचं मनापासून अभिनंदन! **तुम्ही आज कुठे आहात यापेक्षा तुमचा प्रवास कोणत्या दिशेने सुरू आहे, यावर तुमचं कर्तृत्व ठरतं; हे लक्षात ठेवा.** अन् म्हणूनच आपण 'छात्र प्रबोधन'तर्फे एक खास बक्षीस योजना जाहीर करत आहोत... **'प्रगतिवीर' पुरस्कार**! तुम्हाला सहामाही परीक्षेत जेवढे गुण (टक्के) मिळाले आहेत ते १०० मधून वजा करा आणि आलेल्या संख्येला ३ ने भागा. जेवढे उत्तर येईल तेवढे टक्के गुण तुम्ही सहामाही परीक्षेपेक्षा वार्षिक परीक्षेत जास्त मिळवले तर तुम्हाला 'प्रगतिवीर' पुरस्कार मिळेल! एक पुस्तक, सन्मानपत्र आणि रु. १०१/- चे रोख पारितोषिक असे या पुरस्काराचे स्वरूप असेल. शिवाय एकही शिकवणी, क्लास न लावता तुम्ही प्रगती केलीत तर पुरस्कारात रु. ५०/- ची भर पडेल. सातवी ते दहावीमधील 'छात्र प्रबोधन'चे कोणीही सभासद यासाठी नोंदणी करू शकतील. आपले नाव, इयत्ता, शाळा, गाव, सहामाहीचे टक्के व सभासद क्रमांक ही माहिती लिहून पोस्टाने, ई-मेलने वा SMS द्वारा (९४०४२२४७०५) ३१ डिसेंबर २०११ पर्यंत 'प्रगतिवीर पुरस्कारासाठी' असे लिहून पाठवा. ठरवून प्रगती करण्याला महत्त्व आहे. आपोआप, अचानक गुण वाढले तर हा पुरस्कार मिळणार नाही. तेव्हा आत्ताच हा पुरस्कार मिळवायचा हे नक्की करून टाका. तसे नोंदणी करून आम्हाला कळवा आणि ठरवून अभ्यासाला लागा. 'छात्र प्रबोधन'च्या सर्व वाचकांना पुरस्कार मिळवण्यासाठी संधी आहे. आणि अपेक्षित प्रगती करणाऱ्या सर्वांना सारखाच पुरस्कार मिळणार आहे. (त्यात पहिला-दुसरा असा क्रमांक नाही, रक्कम विभागून देण्याची भानगड नाही आणि Lucky draw द्वारे मोजक्याच सभासदांची अन्यायकारक निवडही नाही) तेव्हा करणार ना नोंदणी? तुमच्या प्रतिसादाची वाट पाहातो.*

*हिवाळा सुरू झालाय तेव्हा व्यायामाला लागणार ना? 'उजळती वाट' या लेखमालेतील या अंकातील लेखात 'युक्ताहार विहार' या व्रताबद्दल लिहिलंय, ते तुम्ही आवर्जून वाचा. येत्या ३ महिन्यांत हळूहळू व्यायाम वाढवत न्या. ताकद, लवचिकता, चपळता, दम, वेग या शारीरिक तंदुरुस्तीच्या पैलूंच्या विकासासाठी विविध प्रकारचा व्यायाम करा. स्वत: दीर्घकाल, वयाच्या सत्तरी-ऐंशीपर्यंत तंदुरुस्त, निरोगी राहाण्यासाठी तर त्याची आवश्यकता आहेच; पण अन्यायाविरुद्ध, गुंडगिरीविरुद्ध दंड थोपटायलाही सशक्त, मजबूत शरीर अत्यावश्यक आहे. हे मुलांइतकेच मुलींनाही लागू आहे बरं का! व्यायाम, खेळ म्हटलं की ते आपल्यासाठी नाही असा चुकीचा समज मुलींनी अजिबात करून घ्यायचा नाही. तेव्हा घाम निथळेपर्यंत मस्त मैदानी खेळ खेळा, सर्वांगीण व्यायाम करा. प्रखर बुद्धिमत्तेबरोबरच पोलादी मनगट असलेला सशक्त विद्यार्थीच उद्याच्या विकसित भारताचे स्वप्न प्रत्यक्षात आणू शकणार आहे. तेव्हा तात्पर्य काय... **आळस झटकून व्यायामाला लागा!***

*शाळेतल्या विविध स्पर्धा, क्रीडामहोत्सव, स्नेहसंमेलन यात हिरिरीने भाग घ्या. त्यात तुमच्या शाळेत काही विशेष, नावीन्यपूर्ण घडलं तर आम्हालाही जरूर कळवा.*

*अनेक गोष्टींसाठी भरभरून शुभेच्छा!*

**सस्नेह तुमचा,**

**(महेन्द्र सेठिया)**



सोड निराशा, झाड आळसा, ध्येयपथा आक्रमी ।
वाटाड्या हो तुझा तूच, मग तुला कशाची कमी ॥

‘छात्र प्रबोधन’ हे तुम्हा मुला-मुलींचं मासिक आहे. तुमच्यासाठी ते एक हक्काचं व्यासपीठ आहे. ‘छात्र प्रबोधन’ सोबत तुम्ही ‘मोठं’ होत जाणं, अनुभवसंपन्न होत जाणं महत्त्वाचं आहे. असंच ‘छा.प्र.’ सोबत मोठं होत असलेल्या प्रसाददादाचं हे मनोगत तुम्हालाही नक्कीच आवडेल. प्रसाददादाच्या या मनोगताबरोबरच दिवाळी अंकाबद्दलच्या स्वच्छंदच्या आणि इतर काही ‘छा.प्र.’मय प्रतिक्रिया...

# ‘छा.प्र.’मय

**– प्रसाद सांडभोर**

काय मग? कशी होती दिवाळी? सुट्टीत काय काय केलंत? मी तर बुवा खूप खूप धम्माल केली. पण खरं सांगू का? मी आता इंजिनिअरिंगच्या शेवटच्या वर्षाला असल्यानं नाही म्हटलं तरी दिवाळीनंतरच्या परीक्षा-अभ्यास या गोष्टींचं टेन्शन होतंच. परीक्षा-बिरीक्षा झाल्यावरची दिवाळी सुट्टी नाही अनुभवता आली मला. पण दर दिवाळीतला ‘छा.प्र.’ वाचायचा माझा उद्योग याही दिवाळीत मी अर्थातच केला.

नुकताच ‘छा.प्र.’चा दिवाळी अंक वाचून झाला. डॉ. संजय ढोले यांची ‘शिकस्त’ ही विज्ञानकथा भन्नाट आहे, हो ना? ‘प्रवास’ ही गव्हाच्या दाण्याची गोष्ट फारच वेगळी वाटली. मी दरवेळी आतुरतेने वाट पाहातो ती ‘मीश्का’चे पराक्रम सांगणाऱ्या कथेची! मागच्यावर्षीचा गॅप घेऊन यावेळी ‘दोस्त’मधून मीश्का आणि त्याच्या मित्राने जाम धमाल उडवून दिली आहे. विवेक पोंक्षे सरांच्या लेखातून ‘एन. आय. एफ.’ ची ओळख झाली. भारत सासणेंच्या साहसकथाही मला वाचायला आवडतात. पण गेली एक-दोन वर्षं त्यांच्या कथा ‘छा.प्र.’तून वाचायला मिळाल्या नाहीत. ‘च्युईंगमच्या रहस्या’च्या निमित्ताने चित्रकथा अंकात आली आहे खरी; पण रहस्य अगदी सहजपणे कळणारं होतं, त्यामुळे मजा नाही आली. ‘आम्हीच लिहिणार आमची पाने’ मधली सलीलची कविता आवडली. या सदरातले चारही लेख चार ठिकाणाहून आलेत, हे विशेष. ‘संवाद’ आणि लेखमालेने विचार करायला भाग पाडलं... आपण कसे वागतो? कसं वागायला हवं? इ.... दरवर्षीप्रमाणेच संपूर्ण अंक वेगवेगळ्या विषयांनी- साहित्यप्रकारांनी गच्च भरलेला आहे. मांडणी आणि सजावट विशेष आवडली.

या दिवाळी अंकात मी लिहिलेली ‘पहिला चहा’ ही वेद्याची गोष्टदेखील छापून आली आहे! माझ्यासाठी हे एक मोठ्ठं ‘सरप्राईज’ होतं. जयश्रीताईंनी अजिबात कळू दिलं नव्हतं याबद्दल ! त्यामुळे यावेळचा दिवाळी अंक माझ्यासाठी आश्चर्याची आणि आनंदाची दिवाळीभेटच आहे - ‘छा.प्र.’कडून मिळालेली! ही कथा मराठीतून आणि इंग्रजीतून वाचणं, ‘बोलक्या अंका’त ऐकणं खूपच वेगळा अनुभव होता... छान वाटलं, मजा आली - छे, अगदी योग्य असा शब्दच नाही सापडत!

शेवटच्या पानावरची स्पर्धा निवेदनं वाचली. ‘हस्तलिखित स्पर्धे’ची घोषणा पाहिली, तेव्हा मला आम्ही बनवलेली हस्तलिखिते आठवली. अंकात वाचून सलग तीन वर्षं आम्ही मित्र-मैत्रिणींनी मिळून या स्पर्धेत भाग घेतला होता... दोनवेळा दुसरं बक्षिसही मिळालं होतं. एकदा तर आमच्या हस्तलिखितावरच्या कोलाज चित्राला ‘छा.प्र.’च्या विद्यार्थी विशेषांकाचं मुखपृष्ठ होण्याचा मानही मिळाला होता!! या हस्तलिखितांमधूनच लिहायची-चित्रं काढायची, आपले विचार मांडण्याची सवय लागली. मला आठवतं, त्सुनामीवरच्या एका कवितेवर मुलांच्या एका अंकात मी चित्र काढायचाही प्रयत्न केला होता. अंकामधून येणारी गिरीश सहस्रबुद्धे, सचिन जोशी यांची चित्रं मला फार आवडतात. त्यांच्याएवढं भारी चित्रं काढायला नाही जमलं मला, तरी मी काढलेलं चित्र अंकात छापून आलं होतं.

शाळेतर्फे एकदा ‘सृजनाला पंख नवे’ स्पर्धेतही भाग घेतला होता. ती स्पर्धा आठवली, त्या निमित्ताने कुमार

। अभिनंदन - कवी सुधीर मोघे (कविवर्य केशवसुत स्मृती काव्य पुरस्कार) ।
प्रायोजक – डॉ. मुकुंद करंबेळकर, चाळीसगाव

महोत्सवात सहभागी होण्याची संधी मिळाली होती... आठ दिवसांची 'रायगड जिल्हा सायकल सहल' आठवली... या सहलीसाठी आम्हा पुण्यातल्या काही मुलांना जमवून एक मार्गदर्शिका बनवण्यात आली होती. तो माझा 'छा.प्र.'च्या कार्यालयातला पहिला अनुभव ! आठ दिवसांत ३१६ कि.मी.... एवढं सायकलिंग करू शकू का आपण? असं सुरुवातीला वाटत होतं तेव्हा. पण नव्या मित्रांसोबत, गटात स्वत:तली क्षमता ताणून पाहिली आणि जमलं की ! 'छा.प्र.' सोबतचा माझा प्रत्येक अनुभव असाच आहे - नवीन काहीतरी करून पाहाण्याचा, उत्साह देणारा, क्षमता ताणून बघायला शिकवणारा आणि दरवेळी मलाच माझी नव्यानं ओळख करून देणारा !

मुलांच्या अंकाच्या विद्यार्थी संपादक मंडळात होतो तेव्हातर महिनाभर मी 'छा.प्र.'च्या कार्यालयात मुक्कामच ठोकला होता ! 'छा.प्र.' कसं बनतं ते कळलं तेव्हा. लेख गोळा केले, प्रुफ रिडिंग शिकलो, चित्र काढून घेतली. संपादनाच्या बऱ्याच तांत्रिक बाबी तेव्हा शिकायला मिळाल्या. ले-आउट कसा लावतात ते कळलं. त्या अंकाचा विषय निघाला की मला लगेच आम्ही प्रयत्नपूर्वक, कष्टपूर्वक बनवलेली 'जीवनसत्त्वांची सापशिडी' आठवते! केवढा खटाटोप केला होता ती कव्हर ३ वर छापण्यासाठी. महेन्द्रभाईंनी सापशिडीचे चौकोन - नियम आखून दिले होते. आम्ही १०-१० चांगल्या-वाईट सवयी प्रश्नोत्तर रूपात त्या चौकोनात भरण्याकरता खटपट केली होती. एवढंच काय, ही सापशिडी एकदा खेळूनही पाहिली होती. फार कंटाळवाणं वगैरे तर होत नाहीयेना हे तपासायला ! (पुढे एका दिवाळी अंकात याच सापशिडीची जरा सुधारित आवृत्ती पाहून गंमत वाटली होती.) त्या अंकाचा 'संवाद'सुद्धा कितीवेळा लिहिला असेल आम्ही! महेन्द्रभाईंचा विषय निघालाच आहे म्हणून सांगतो, त्यांच्याशी जाऊन बोलायचं म्हणजे गंमतच असते. तुम्ही काहीही विचार ठरवून जा - त्यांच्यासमोर बसलात, बोललात की बाहेर पडताना तुमच्या डोक्यात वेगळंच काहीतरी असतं ! पण याचा त्रास अजिबात नाही वाटत हं. उलट त्या निमित्ताने आपण वेगवेगळ्या बाजूंनी विचार करायला शिकतो - मजा येते. विशेषत: संपादक मंडळात काम करताना असा अनुभव बरेचदा मिळाला.

पुढे 'युवोन्मेष' दिवाळी अंकाच्या संपादक मंडळात काम करायची संधी मिळाली. दिवाळी अंकाच्या धामधुमीचाही अनुभव घेतला. त्यातल्या एका लेखमालेकरता लातूरच्या 'जनाधार' संस्थेला भेट देऊन आलो. पहिल्यांदाच 'संस्था परिचय' लिहिला. दरम्यान अधूनमधून काही सुचलं - लिहिलं तर जयश्रीताईंना वाचायला द्यायचो... कसं लिहावं, कसं लिहू नये हे कळू लागलं. त्यातलं काही लिखाण 'छा.प्र.'च्या नित्य अंकात छापूनही आलं. 'छा.प्र.'च्या लेखन कार्यशाळेत मात्र मला कधीच सहभागी होता आलं नाही. नेमकी त्याच तारखांना माझी परीक्षा असायची.

तरी 'छा.प्र.'सोबत बरीच धमाल-मजा-मस्ती केली आहे आणि यापुढेही करत राहाणार आहे ! 'पहिल्या चहा'च्या निमित्ताने हे सगळं तुमच्यापर्यंत पोचवावंसं वाटलं... अरे हो, ''गोष्ट आवडली'', ''भार्‍री आहे कथा...'', ''पहिला चहा मस्त - प्रत्येक घुटक्याला ताजंतवानं करणारा...'' अशा तुमच्यापैकी काहींच्या प्रतिक्रिया मिळाल्या. छान वाटलं. पण 'आपला पहिला चहा आपण कधी घेतला?' हे मात्र कोणीही कळवलेलं नाही. आणि ज्यांनी मलाच उलट प्रश्न केलाय त्यांच्यासाठी - 'मी चहा घेत नाही ! नाही अगदी कॉफीसुद्धा नाही !!'

'छा.प्र.' मधून भेटत राहूच.

**– प्रसाद सांडभोर**
१३ ए, विजयश्री सोसायटी, कोथरुड, पुणे 411038
sandbhorprasad@gmail.com

---

संपूर्ण अंक मस्तच झाला आहे. 'छा.प्र.'चा दिवाळी अंक मिळाला म्हणजे पहिल्यांदा कथांचा फराळ करायचा. यावेळच्या सर्वच गोष्टी मस्त आहेत. म्हणजे खरंतर दरवेळी एक देनिस(रशियन कथांमधील मीश्काचा आपल्याला गोष्ट सांगणारा मित्र), रहस्यकथा असे असतेच. पण यावेळची देनिसची गोष्ट अगदी मस्त होती. 'दोस्त, पेनडेक, शिकस्त, पहिला चहा' सगळ्यांतच भन्नाट कल्पना मांडल्या आहेत. स्वत:चे मूल दुसऱ्याला



। ऐका - नाविका रे वारा वाहे रे - गायिका सुमन कल्याणपूर।
। कै. प्रभाकर बळवंत करंदीकर स्मरणार्थ। **प्रायोजक – श्री. संजीव प्रभाकर करंदीकर, ठाणे**

देऊन त्याची प्रगती बघणारे समजुतदार पेनडेक जोडपे मनाला फार भावले. सगळ्यात जास्त आवडला तो 'चहा प्रकल्पाचा' वेदव्रत. प्रसाद सांडभोर यांची 'पहिला चहा' ही कल्पनाच एकदम मस्त आहे. 'प्रवास' ही वेगळ्या धाटणीची कथाही खूप आवडली. एका 'बी' चा प्रवास. आणि त्याची मांडणी फार छान केली आहे.

कुसुमाग्रजांच्या जन्मशताब्दी वर्षाच्या निमित्ताने गायत्रीने 'आगगाडी आणि जमीन' या कवितेचा लिहिलेला रसास्वाद सुंदर आहे. कवितेतली सौंदर्यस्थानं अतिशय छान रीतीने तिने दाखविली आहेत. जमीन हे दुर्बल, शांत समाजाचे प्रतीक, आगगाडी हे उन्मत्त व्यक्तीचे प्रतीक आहे आणि सहनशक्ती संपल्यावर शांत समाज पेटून उठतो व उन्मत्तपणा, माज यांचा पराभव करतो; हे तर तिने मांडले आहेच, पण त्याचबरोबर कितीही प्रगती केली, तरी निसर्गावर अतिक्रमण केल्यावर तो कोपेल, ही महत्त्वाची गोष्ट तिने मांडली आहे.

अंकिताने म्हणजे खरंतर तिच्या 'सॅक'ने साहस सहलीचे वर्णन अगदी मस्त केले आहे. वर्णनात कुठेही अंकिता जाणवत नाही हे विशेष!

कोमल डांगरेची निरोगी, धडधाकट माणसांचे स्वप्न पाहणारी सरिता आणि तिने केलेलं 'जन्मत: अंध, अपंग असणाऱ्यांना धडधाकट, निरोगी करण्यासाठी शोध लावा.' हे आवाहन तर मला फारच आवडलं.

शैलजाताईंचा 'शब्दफुले अक्षरली' हा लेख फार आवडला. चैत्रापासून फाल्गुनपर्यंतचे ऋतू, त्यातली फुलं आणि त्यांचे वर्णन करणारी कविता याचा अतिशय छान मिलाफ बांधला आहे. तसेच. 'जोडी जमली रे' हा सुभाष देशपांडे यांचा लेखही छान आहे. आपल्या आजूबाजूला असलेल्या, यशस्वी झालेल्या, कायम लक्षात राहाणाऱ्या जोड्या! 'जोड्या' हा विषय वेगळा आहे आणि या दोस्तांसाठी आपट्याच्या पानाची उपमा फारच आवडली.

आकाशकंदील, कोलाज शिल्प आणि हलत्या चित्राचे भित्तीशोभन छान आहेत. कोलाज शिल्पाची कल्पना विशेष आवडली.

विदेशात जाऊनही आपल्या देशाचा अभिमान असणारा. आपल्या देशाची आठवण ठेवणारा, 'विदेशातील भाऊ'ही आवडला. 'डबेवाल्याच्या पोराचे' विचार मांडणारी कविता फार छान आहे.

एक महत्त्वाची गोष्ट म्हणजे चित्रे. ज्या लेखाच्या बॅक ग्राउंडला चित्रे आहेत. त्यांचा रंग बरोबर फिका ठेवला आहे. 'छा.प्र.'मधले रंग अगदी प्रमाणात आहेत. हे विशेष.

मुखपृष्ठ फारच मस्त आणि तजेलदार आहे. वेगवेगळ्या प्रकारचे आकाशकंदील फारच छान आहेत.

अंक वाचताना त्यातलं काही आवडलं नाही, असं झालं नाही. एकूण संपूर्ण अंक आपण वाचावा आणि दुसऱ्यांनाही वाचायला द्यावा, असा झाला आहे.


**कु. स्वच्छंद गंदगे**
७, पगारिया नेलगे प्लाझा,
पुणे-नाशिक रस्ता, भोसरी,
पुणे 411039


## ❊ काही बोलक्या प्रतिक्रिया ❊

❊ ...अंक खूपच छान झाला आहे. मुखपृष्ठ, आतील सजावट, सर्व चित्रे, कागदाचा दर्जा, छपाई या सर्व अंगांबरोबर लेख, कथा, कविता, ज्ञान विज्ञान, कृतिपर, संकीर्ण अशी सर्वच सदरे अत्यंत चांगली झाली आहेत. अभिनंदन!

- डॉ. सुमन नवलकर (कवयित्री), मुंबई

❊ ...आश्लेषा महाजन यांची कविता फारच मनाला भिडली. 'मिळून-जुळून-जमून यायला वेळ फारसा लागलाच नाही!' विद्यार्थ्यांचे न्यूटन श्री. नचिकेत नित्सुरे यांच्या अजून एका गुंगवणाऱ्या व पुष्कळ काही सांगून जाणाऱ्या प्रयोगाने महाराष्ट्रातील मेणबत्त्यांचा खप थोडातरी नक्कीच वाढेल. कु. गायत्री जोशीचे रसग्रहण प्रौढ आणि परिपक्व वाटले. कु. अंकिता आपटेच्या लेखाने अजिबात न आपटता अपेक्षित उंची गाठली आहे. असो. वैशिष्ट्यपूर्ण, मनोरंजक आणि बोधप्रद अंक आवर्जून पाठवल्याबद्दल धन्यवाद. - किरण बर्वे (लेखक), पुणे

करण्यासारखं खूप आहे, उमेद मात्र हवी। मिळण्यासारखं ध्येय आहे, जिद्द मात्र हवी।।

प्रायोजक - श्री. अमर परांजपे, सांगली

# वृक्षराया...

माथी तीव्र ऊन
स्वये सोसोनिया
श्रांत जीवा छाया
गोड देशी ! ।।१।।

चित्ताकर्षणारी
फुले फुलवोनी
देशी उधळोनी
आम्हावरी ।।२ ।।

सुधारसपूर्ण
फळे पिकवोनी
अमृते भरोनी
आम्हा देशी ! ।।३।।

मंद हा सुगंध
पांचुपरी रंग
तुझे अंतरंग
दयामय ! ।।४।।

वृक्षराया तुझे
किती उपकार
केवढा आधार
तुझा आम्हा ! ।।५।।

आम्हा माणसांची
जात नतद्रष्ट
निसर्गच नष्ट
केला आम्ही ! ।।६।।

**– शरद कुलकर्णी**
बी २०३/आर. एक्स. ५, 'कार्तिकेय' हौ. सोसा.,
म. औ. वि. म. निवासीविभाग – १, सुदर्शननगर,
डोंबिवली (पू.) जि. ठाणे 421203



। दिनविशेष : ३ डिसेंबर - जागतिक अपंग दिन।

**प्रायोजक – श्री. निखिल रामचंद्र कात्रे, डोंबिवली**

लेखांक – २

# युक्ताहार विहार

– वाच. स्वर्णलता भिशीकर

**प्रिय चारुहास,**

तुला दिवाळीचं शुभेच्छापत्र आणि 'छात्र प्रबोधन'चा दिवाळी अंक पाठवला होता. मिळाला ना? आणि आवडला ना? दिवाळी म्हटलं की फराळ नि फटाके आलेच. कित्येक जण तर पैजा लावून लाडू, चकल्या खातात! आपलं पोट आणि आपलं मन यांचं नेहमी भांडण होत असतं बरं का चारू! पोट म्हणतं की 'पुरे बाबा आता! मला ओझं होतंय! पण आपलं मन आपल्या पोटाचं ऐकतच नाही!

म्हणून आपण विद्याव्रत संस्काराच्या तयारीमध्ये 'युक्ताहार विहार' नावाचं व्रत विद्यार्थ्यांसाठी सांगितलं आहे. आपण पोटाला वाजवीपेक्षा जास्त भार दिला तर तो पचवण्यातच आपली सगळी ऊर्जा खर्च होते. मग गणितातली अवघड प्रमेयं सोडवायला ताजेपणा राहात नाही. डुलक्या यायला लागतात. व्यायाम शरीराला आवश्यक खरा पण तोसुद्धा वाजवीपेक्षा जास्त झाला तर आपण दमतो. मग दुसरं काही करायला उत्साह वाटत नाही. म्हणून **'युक्ताहार विहार'** हे व्रत महत्त्वाचं.

पण 'युक्ताहार विहार' हा शब्द आला तरी कुठून? त्याचा नेमका अर्थ काय? हा शब्द आहे गीतेच्या सहाव्या अध्यायातल्या एका श्लोकामधला. 'युक्त' म्हणजे योग्य. 'आहार' म्हणजे खाणं आणि 'विहार' म्हणजे फिरणं - व्यायाम - काम इत्यादी. आहार (खाणं) आरोग्याला चांगला पण तो किती घ्यायचा याला मर्यादा असते. म्हणून 'युक्त' याचा अर्थ 'योग्य' आणि 'प्रमाणात', योग्य आणि प्रमाणात खाणं आणि त्याचप्रमाणे व्यायाम-खेळ इ. करणं म्हणजे युक्ताहार विहार.

चारू, मध्यंतरी वर्तमान पत्रात एक बातमी आली होती की अमेरिकेतील सुखवस्तू वर्गात छोट्या मुलांच्या लठ्ठपणाचं प्रमाण वाढलं आहे. कारण खूप वेळ टीव्ही पुढे बसायचं आणि टीव्ही बघता बघता वेफर्स, वेगवेगळ्या प्रकारचे दाणे, अशाप्रकारचे तळलेले, कुरकुरीत, चमचमीत पदार्थ खायचे. शिवाय व्यायामाला सुट्टी ! मग वजन वाढेल नाही तर काय? चौरस आहाराबद्दल आपण विज्ञानात शिकतो. पिष्टमय पदार्थ, डाळी-कडधान्य हे प्रथिनयुक्त पदार्थ, महत्त्वाची जीवनसत्वं असणारे पदार्थ हे बहुतेक आपल्या घरच्या साध्या जेवणातही असतातच. म्हणून आपली आई आपल्याला मोड आलेल्या कडधान्यांची उसळ डब्यात देते. ज्यांची शाळा लवकर असते ते जेवणाचा डबा घेऊन शाळेत जातात. प्रत्येक शाळेमध्ये डब्यात पोळी-भाजीच आणायची असा नियम असतो; तो पोषक द्रव्य मुलांना मिळावीत यासाठीच! सकाळी काहीतरी न्याहारी करणं चांगलं. संध्याकाळी खाऊन रात्री उशिरा जेवण्याची पद्धत अलीकडे बऱ्याच घरांमध्ये दिसते. पण आरोग्यशास्त्र सांगतं की झोपण्यापूर्वी तीन तास आधी जेवण झालेलं असलं पाहिजे. म्हणजे झोप स्वस्थ येते. रात्री बारापूर्वीची झोप आरोग्यासाठी फार उपयोगी असते. म्हणून पूर्वी लवकर झोपायचं आणि

**विद्याव्रत संस्कारातला श्लोक**

✻ युक्ताहारविहारस्य, युक्तचेष्टस्य कर्मसु। युक्तस्वप्नावबोधस्य, योगो भवति दुःखहा।। (गीता ६-१७)

✻ निजणे, जागणे, खाणे, फिरणे आणि कार्य हि। मोजूनि करितो त्यास योग हा दुःख-नाशन।। (गीताई ६-१७)

**अर्थ -** ज्याचं खाणं, फिरणं, काम करणं, झोप आणि जागेपणीचा काळ हे सर्व प्रमाणात आणि नियमित असतात, अशा मनुष्यासाठी योगाचं आचरण सुख देणारं होतं.

अजून ओली माती माझी, रोज घडण ताजी ।
नवे वळण अन् नवी गतीही, रोज नवी बाजी।।

**व्रत म्हणजे** ठरवून केलेले नियमित आचरण. उत्तमरीतीने विद्याग्रहण करण्यासाठी शरीर निरोगी, सदृढ, चपळ, काटक असायला हवं. त्यासाठी 'युक्ताहार विहार' हे व्रत अंगीकारायचं. त्यासाठी रोजच्या आचरणात काय नक्की, निश्चयपूर्वक कराल?
सुरुवातीला एका संकल्पाने प्रारंभ करा. आणि क्रमाक्रमाने त्यात भर घालत जा. मात्र जे ठरवाल ते झालंच पाहिजे यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करा.

* मी रोज नियमित १२ सूर्यनमस्कार घालीन.
* घरी आईने बनवलेल्या सगळ्या भाज्या, कोशिंबिरी मी खाईन.
* मी टीव्ही पाहात जेवणार नाही.
* मी रोज सकाळी ६ वाजण्यापूर्वी उठेन.
* अभ्यास करताना/वाचताना मी नेहमी ताठ बसेन.

लवकर उठायचं अशी पद्धत होती. पहाटेच्या वेळी छान गार वारा सुटतो. हवेत ताजेपणा असतो. त्या ताज्या हवेत मेंदूही तरतरीत असतो. नवीन गोष्टी त्याला चटकन समजून घेता येतात. म्हणून लवकर उठून अभ्यास करण्याला महत्त्व आहे.

आपल्याला वाटतं की 'आहार' या गोष्टीचा फक्त खाण्याशी किंवा फार तर जिभेशी संबंध असतो. पण आपल्या डोळ्यांचा, नाकाचा, कानाचा, त्वचेचासुद्धा 'आहार' असतो. डोळ्यांनी आपण जे बघतो तो डोळ्यांचा आहार. कानांनी जे ऐकतो तो कानांचा आहार. त्वचेला जो स्पर्श होतो, तो त्वचेचा आहार. डोळ्यांनी चांगल्या गोष्टी पाहायच्या. कानांनी टवाळक्या न ऐकता उत्तम संगीत, उत्तम ज्ञान, उत्तम कथा ऐकायच्या. नाकाने उग्र सेंटचा नव्हे तर ताज्या फुलांचा सुवास घ्यायचा. त्वचेचे पण खूप लाड न करता, साधे सौम्य कपडे घालायचे. काहीजणं जरतारी, खूप घट्ट किंवा खूप ढगळ कपडे घालतात. त्यामुळे फॅशन झाली तरी मन प्रसन्न राहात नाही. रक्ताभिसरण चांगलं होत नाही. म्हणून तोंडाने घ्यायच्या आहाराखेरीज बाकी ज्ञानेंद्रियांच्या म्हणजे कान, नाक, डोळे, त्वचा इ. च्या आहाराविषयीसुद्धा आपण जाणीवपूर्वक काळजी घ्यायला हवी.

ज्याला चांगली विद्या मिळवायची आहे त्याने त्यासाठी पुरेसा वेळ (योग्य) आणि शक्ती दयायला हवी. दिवसभर क्रिकेटची मॅचच पाहात बसलो तर अभ्यासाला वेळ मिळायचा नाही. चित्रपट पाहायचा कुणाला खूप नाद असतो. परीक्षा संपल्यावर सगळ्यांनी मिळून एखादा चांगला चित्रपट पाहाणं वेगळं आणि सतत टी.व्ही.ला चिकटून बसणं वेगळं. गंमत म्हणून केलेली गोष्ट आपलं व्यसन तर होत नाही ना याची आपण काळजी घ्यायला हवी. योग्य आहारात या व्यसनांना लांब ठेवणंही चांगलंच, हो ना? कुठल्याही गोष्टीचा अतिरेक वाईटच, पटतंय ना चारू? त्यामुळेच विद्याव्रत संस्कारासाठी जो 'आहार' आहे तो केवळ पोटापुरता नाही हे तुझ्या लक्षात आलं असेल. तर तो शरीर, मन, बुद्धी या सगळ्यांसाठीचा आहे.

आता विहाराबद्दल थोडंसं. विहार म्हणजे काय तर व्यायाम, हालचाली, काम; हे तुला माहीतच आहे. आपल्याला शाळेत पीटीचा तास असतो. त्यात खरंतर चांगला व्यायाम शक्य आहे. पण तो नियमित होतोच असं नाही. आपल्याकडे सकाळी बारा सूर्य नमस्कार घालायची पद्धत आहे. त्यात शरीराच्या सर्व भागांना, अवयवांना व्यायाम होतो. शिवाय आनंदासाठी खो खो, कबड्डी यांसारखे शरीराला चपळपणा देणारे खेळ आहेत. व्हॉलीबॉल, फुटबॉल आवडत असेल तर ते खेळावेत. पण बुद्धी तरतरीत राहायला हवी असेल तर शरीर तरतरीत, चपळ, तेजस्वी असायला हवं. त्यासाठी व्यायाम हा हवाच हवा. कारण व्यायामामुळे रक्ताभिसरण जास्त सुरळीत, चांगलं होतं. मेंदूला रक्ताचा पुरवठा चांगला होतो. मेंदूही त्यामुळे तल्लख होतो.

**(पान क्र. ११ वर पुढे चालू)**



**ठेवी दृष्टी मुला ध्येय गाठण्याचे। विद्यार्जन करी क्षणही मोलाचे ।।**
। डोळस व्हा आणि हिंमतीने पुढे चला !।। **प्रायोजक – डॉ. सतिशचंद्र गोरे, पुणे**

# माहितीमधले खाणकाम (Data Mining)

डॉ. शुभदा नगरकर

खाण कामगार जेव्हा खाणीत काम करतात तेव्हा ते तिथली माती खणत असतात. ही माती अनेक गोष्टींचे मिश्रण असू शकते. पण आपल्याला ती फक्त 'माती' या स्वरूपातच दिसते. त्या मातीत अशुद्ध स्वरूपात असलेले धातू, विविध प्रकारचे छोटे-मोठे दगड, कोळसा, पैलू न पडलेले अशुद्ध स्वरूपातले हिरे, सोनं, युरॅनियम, खनिज तेल, रॉक सॉल्ट, पोटॅश, चुनखडी अशा कितीतरी गोष्टी असू शकतात. पण या कामातून नक्की काय बाहेर काढायचं आहे आणि त्यासाठी कोणत्या प्रकारची यंत्रसामुग्री किंवा कौशल्य वापरायचं, हे प्रथम ठरवावं लागतं. तरच हवी असलेली 'गोष्ट' किंवा 'माल' मिळू शकतो. दोस्तांनो, तुमच्या बाबतीत किंवा तुमच्या आजूबाजूला अशा प्रकारच्या गोष्टी, किंवा अशा सदृश काही घडतं का? तुम्ही मिश्रस्वरूपात असलेल्या गोष्टींतून काही वेगळं काढता का? डोक्याला थोडा ताण द्या, तुम्हाला नक्की लक्षात येईल की, अगदी तसं नाही पण थोडं फार या कृतीशी मिळतीजुळती कृती आपणही करत असतो.

तुम्हाला एखादं 'प्रोजेक्ट' करायचं असेल तर कॉम्प्युटरवर सर्फिंग करून तुम्ही खूप माहिती मिळवता. ती सगळीच तुम्हाला उपयुक्त असतेच असं नाही. तुम्हाला हवी असलेली माहिती तुम्ही अचूक निवडता आणि पुढे तुमचं कौशल्य वापरून त्यावर योग्य विश्लेषण करून मगच ती प्रोजेक्टमध्ये वापरता, बरोबर ना? एखाद्या झाडाचा, प्राण्याचा फोटो हवा असेल तर तुम्ही 'गुगल' उघडता, हवा असलेला शब्द टाकता, बरेच 'ऑपशन्स' येतात, कॉम्प्युटरच्या 'मदर बोर्ड'वरची बटनं दाबून तुम्ही भरपूर माहिती मिळवता. म्हणजेच तुम्हाला हव्या असलेल्या विषयातल्या 'माहिती'मध्ये तुम्ही बुडून जाता. पण प्रत्यक्षात तुम्हाला फार कमी ज्ञान मिळतं. तुम्हाला हवी असलेली नेमकी माहिती यातून मिळतेच असं नाही. मग तुम्ही त्यासाठी काय करता? तुम्ही मिळवलेल्या 'भरमसाठ' माहितीतून अनावश्यक (गैरलागू/Noisy) माहिती बाजूला काढता. त्यामुळे तुमच्याकडे आवश्यक माहितीचं 'कोठार' तयार होतं! त्यातल्या फक्त अचूक, तुम्हाला हवी असलेली आणि योग्य माहितीची निवड करून त्याचं विश्लेषण करता तेव्हा तुम्हाला पुढे उपयोगी पडणारं ज्ञान मिळतं! या अचूक/ नेमक्या माहितीवर योग्य प्रक्रिया करून, त्याचा योग्य 'अन्वयार्थ' लावून तुम्ही ठरवलेल्या ध्येयापर्यंत पोहोचता. हे जे काही तुम्ही करता त्याला कॉम्प्युटरच्या परिभाषेत 'डेटा मायनिंग' म्हणतात. 'डेटा मायनिंग'च्या पायऱ्या खालील तक्त्यात मांडण्याचा प्रयत्न केला आहे.




तंत्रज्ञानाच्या युगात अनेक गोष्टी कमी वेळात होऊ शकतात, एवढंच नव्हे तर त्या गोष्टींची माहिती कायमस्वरूपी साठवली जाते. ती केव्हाही आपण वापरू

**'डेटा मायनिंग' म्हणजे हे नव्हे -**

✻ फोनच्या डिरेक्टरीतून एखाद्याचा नंबर शोधणे. ✻ गुगलवर एखादा विशिष्ट शब्द (keyword) शोधणे.
✻ वेगवेगळ्या वयातल्या लोकांच्या पगाराचा आलेख करणे. ✻ फक्त सॉफ्टवेअरची माहिती असणे.
✻ नुसती 'माहितीची कोठारं' (Data warehouse) तयार करणे. ✻ ऑन-लाईन पृथ:करण करणे.
✻ संख्याशास्त्राच्या पृथ:करणाचे शास्त्र वापरणे. ✻ माहितीचे (Data) काल्पनिक चित्र डोळ्यासमोर उभे करणे.

*संख्याशास्त्र सद्य परिस्थिती सांगते तर 'डेटा मायनिंग' भविष्याचा वेध घेते.*

शकतो किंवा त्याचा उपयोग वेगळ्या कारणासाठीही करू शकतो. आता अनेक ठिकाणी पारंपरिक दुकानांऐवजी 'मॉल', 'मार्ट', 'स्पेन्सर्स', 'कॅफे', 'शॉपी' दिसतात. त्यात देशी परदेशी माल खचाखच भरलेला असतो. पण तिथे मालाची नुसतीच भाऊगर्दी नसते. त्या मालाचं योग्य वर्गीकरण करून तो आकर्षक पद्धतीनं मांडलेला असतो. एखादी वस्तू तुम्ही विकत घेतलीत तर त्याचं 'कॉम्प्युटराईज्ड्' बिल तुम्हाला मिळतं! त्या बिलावर तारीख, वेळ, कोणता, कसा आणि किती माल घेतलाय, तुम्ही पैसे कसे आणि किती दिलेत, तुम्हाला पैसे परत कसे दिलेत या सर्वांची नोंद असते. हे सगळं संगणकात रोजच्या रोज साठवलं जातं! आपोआपच तिथे प्रचंड प्रमाणात, विविध स्वरूपात माहिती (डेटा) साठवली जाते. 'माहितीचा साठा' तयार होतो. कोणता माल किती खपला याची नोंद तिथे उपलब्ध असली तरी ती एकत्रित नसते. पण उपलब्ध असलेल्या माहितीतून (म्हणजेच बिलांमधून) म्हणजेच 'माहितीच्या साठ्यातून' आपल्याला हवी असलेली आणि योग्य माहिती बाजूला काढू शकतो. 'मॉल' आणि त्यासारख्या अनेक भांडारांमधून मालाची विक्री अधिक कशी होईल यासाठी त्याचा उपयोग करता येतो. कसा ते पाहू.

अमेरिकेतल्या एका मॉलमधल्या बिलांमधून (माहिती) जेव्हा 'ओरॅकल' या 'सॉफ्टवअर'च्या साहाय्याने 'डेटा मायनिंग' करण्यात आलं तेव्हा असं लक्षात आलं की आठवड्यातल्या गुरुवारी आणि शनिवारी बीअर/शीतपेयांच्या वगैरे बाटल्या आणि लहान मुलांचे 'डायपर' जास्त प्रमाणात एकाच वेळेला विकले जातात. व्यापारीदृष्ट्या बघितलं तर या दोन्ही गोष्टी पूर्णपणे वेगळ्या आहेत, त्यांचा परस्पर काहीही संबंध नाही. त्यामुळे ही दोन्ही उत्पादनं वेगवेगळ्या विभागात ठेवली जात होती. मॉलच्या व्यवस्थापकांनी या विखुरलेल्या माहितीचा उपयोग करून ग्राहकांच्या सोयीसाठी ही दोन्ही उत्पादने गुरुवारी आणि शनिवारी एकाच ठिकाणी ठेवली. या दोन्ही गोष्टी घेणाऱ्या ग्राहकांचा वेळ तर वाचलाच शिवाय या दोन्ही उत्पादनांचा खपही प्रचंड वाढल्याचे लक्षात आले. 'डेटा मायनिंग' तंत्रज्ञानामुळे अशाप्रकारे विखुरलेल्या माहितीचे विश्लेषण करणे, एकत्रीकरण करणे, सहसंबंध जोडणे शक्य झाले. 'डेटा मायनिंग' तंत्रज्ञानाची कार्ये यावरून पुढीलप्रमाणे नोंदवता येतात.

- माहितीचे वर्गीकरण (Classification)
- माहितीचे एकत्रीकरण (Clustering)
- माहितीचा सहसंबंध जोडणे (Association)
- माहितीचा क्रम लावणं (Sequencing)
- अधिकृत नमुने उभे करणे (Pattern recognition)
- माहितीच्याआधारे ठोस अंदाज वर्तवणे/ भाकित करणे (Forecasting)

शहरात, गावागावात, देशात, जगभर काही उपाहारगृहांच्या शाखा-उपशाखा (रेस्टॉरण्ट चेन) आहेत. 'मॅकडोनॉल्ड' तर तुम्हाला माहीत आहेच. सबंध जगभरात त्यांच्या शाखा आहेत. पण तरीसुद्धा एखादा खाद्यपदार्थ सगळ्या शाखांमध्ये मिळत असला (उदाहरणार्थ-बर्गर) तरी इतर पदार्थ सर्व शाखांमध्ये समान असतीलच असं नाही. एवढेच काय पण 'बर्गर'मध्ये सुद्धा फरक असू शकतो. उपाहारगृहाच्या कोणत्या शाखेत कोणत्या प्रकारचा ग्राहक येतो, कधी येतो, कोणत्या वारी जास्त गर्दी असते, कोणत्या अन्नपदार्थाची मागणी सगळ्यात जास्त प्रमाणात आहे. अशा प्रकारचं विश्लेषण 'डेटा मायनिंग' मुळे सहजी शक्य होऊ शकतं. म्हणजेच ('डेटा मायनिंग' करून)



। आदरांजली... जगजित सिंग - ज्येष्ठ गझलगायक (१० ऑक्टोबर २०११)।
प्रायोजक – श्री. ऋषिकेश कुलकर्णी, पुणे

दुकानात कशा प्रकारची मांडणी करायची हे मालकाला ठरवता येते. जेणेकरून दोघांचा फायदा होतो, वेळही वाचतो. शिवाय कधी कुठल्या वस्तूचे उत्पादन वाढवायचे याचाही अंदाज या माहितीच्या खाणकामातून येऊ शकतो. त्याप्रमाणात लाखो-करोडोंच्या उलाढाली बाजारपेठांमधून होत असतात.

हे झालं बाजारपेठांच्या बाबतीत. डेटा मायनिंगचा उपयोग आज वैद्यकक्षेत्र, ग्रंथालयं, शिक्षणक्षेत्र, बाजारपेठा अशा सर्वच ठिकाणी परिणामकारक पद्धतीने होताना दिसून येत आहे.

'डेटा मायनिंग' कुठल्या टप्प्यातून होतं हे आपण पाहिलं, पण ही प्रक्रिया थोडी गुंतागुंतीची आहे. एकाचवेळी वेगवेगळी सॉफ्टवेअर्स, अनेक विषयांची माहिती, गर्दीचं मानसशास्त्र या गोष्टी माहीत असाव्या लागतात. म्हणूनच 'डेटा मायनिंग' तंत्र अनेक शाखा - उपशाखांचं-पद्धतींचं (disciplines) बनलेलं आहे.




डेटा/माहिती जेवढी जास्त तेवढं त्यावर खाणकाम करणं सोपं, त्याला तितके वेगवेगळे आयाम मिळणंही क्रमप्राप्तच, हो ना? संगणकीय तंत्रज्ञानाचा यात वापर होत असला तरी स्वत:ची कुशाग्र बुद्धी, बाजारपेठांचा नेमका अभ्यास, गर्दीचे मानसशास्त्र लक्षात घेऊन माणसाने आज हे 'डेटा मायनिंग' तंत्रज्ञान विकसित केले आहे.

※ ※ – **डॉ. शुभदा नगरकर,** ३९० 'सीमांत अपार्टमेंट, हिंगणे खुर्द, सिंहगड रस्ता, पुणे 411051

---

**(पान क्र. ८ वरून पुढे चालू)**

## युक्ताहार विहार

आणखी एक महत्त्वाची गोष्ट सांगते चारू. आपलं शरीर खूप शहाणं नि संवेदनशील असतं. ते सदैव आपल्याशी बोलत असतं. 'आता पोट भरलं आहे. कितीही छान पदार्थ असला तरी आता नको,' हे पोट आपल्याला सांगतं. आपल्या जखमा आपलं शरीर आपलं आपण भरून काढतं. दमलं की झोपी जातं. फक्त हे शरीर आपल्याशी जो संवाद साधू पाहातं; त्याकडे दुर्लक्ष न करता लक्षपूर्वक ते ऐकलं पाहिजे तसं वागलं पाहिजे.

आपलं शरीर जसं आपल्याशी बोलत असतं ना चारू, तसं आपलं मनही आपल्या शरीराशी बोलतं. लोणावळ्याला कैवल्यधाम म्हणून एक संशोधन संस्था आहे. तिथे एक प्रयोग केला. एका मुलाच्या जठराचा नेहमीचा आकार मोजला. मग सगळेजण मिळून त्याला उगाचच रागावले. तो मुलगा इतका हिरमुसला नि दु:खी झाला की बस्स ! त्या वेळी परत त्याच्या जठराचा आकार पाहिला. ते अगदी चिमणीसारखं बारीक बिच्चारं होऊन गेलं होतं. (नंतर त्याला सांगितलं की सॉरी फक्त प्रयोगापुरतं रागावलो होतो.)

म्हणजे आपलं मन आनंदी नसलं तर आपण पुरेसा आहार घेऊ शकत नाही. खेळायला पण उत्साह राहात नाही. म्हणून जेवताना आनंदी असायला हवं आणि खेळताना, अभ्यास करतानाही ! तू म्हणशील की मग आम्हाला मोठी माणसं रागावतात, मग वाईट वाटणार नाही का? आपल्याला कोणी रागावलं तर त्याबाबत काय करायचं असतं, हे मी तुला पुढच्या पत्रात पुढच्या व्रताबद्दल सांगताना तपशीलाने सांगीन. तुझा स्वभाव काही घडीघडी रुसणारा नाही, हे माहीतेय मला. पण तुझ्या मित्रांना माझं पुढचं पत्र नक्कीच उपयोगी पडेल. खूप खूप शुभेच्छांसह.

**तुझी, लताताई**

※ ※

**– वाच. स्वर्णलता भिशीकर, ज्ञान प्रबोधिनी, हराळी, डाक तोरंबा, ता. लोहारा, जि. उस्मानाबाद**

होता अंधार भोवती, अज्ञानाचा दाटलेला। आली योजना दाराशी, ज्ञानदिवा पेटलेला।।

**प्रायोजक – नूपुर नृत्यालय, ठाणे**

वाचलेच पाहिजे असे काही...




**नीलिमा करमरकर**

मुंबईच्या वांद्रे (पूर्व) भागात 'साहित्य सहवास' ही 'कॉलनी' आहे. या कॉलनीचे बाह्यरूप बघता मुंबईतील इतर कुठल्याही सोसायट्यांसारखीच ही आहे. पण या कॉलनीतल्या इमारतींचे अंतरंग मात्र सर्वस्वी आगळेवेगळे आहे. आचार्य अत्रे आणि अनंत काणेकर यांचं साहित्यिकांची वसाहत उभारण्याचं स्वप्न होतं. या कॉलनीतील नऊ इमारतींच्या रूपानं ते साकार झालं. आज या कॉलनीत साक्षात सरस्वती नांदते आहे. हयात असलेल्या किंवा नसलेल्या किती जणांची नावे घेणार? विंदा करंदीकर, विजया राज्याध्यक्ष, रमेश तेंडुलकर, व. पु. काळे, सुभाष भेंडे, गिरीजा कीर, एका ना अनेक! किती लेखकांचा नामोल्लेख करणार? या कॉलनीतून मोठमोठे लेखक, कवी, नाटककार, खेळाडू, संगीतकार, छायाचित्रकार, डॉक्टर्स नावारूपास आले. सचिन तेंडुलकर पण इथलाच ! हे सर्वजण आपल्या यशाचं श्रेय या कॉलनीत झालेल्या जडण-घडणीला देतात.

या कॉलनीच्या आधारे लहानाचा मोठा झालेला सिद्धार्थ पारधे याचं आत्मचरित्रपर लेखन म्हणजे 'कॉलनी' हे पुस्तक आहे. या कॉलनीत वॉचमनचं काम करणारा लक्ष्मण आणि घरोघर धुणीभांडी करणारी कोंडाबाई यांचा सिद्धार्थ हा मुलगा. कॉलनीतील प्रत्येक इमारत उभी राहताना हे कुटुंब त्याचे साक्षीदार होते. इमारती तयार होताना त्याखाली वास्तव्य करत करत अखेर झोपडपट्टीत वास्तव्यास गेलेलं हे कुटुंब या कॉलनीच्या सहकार्यानं घडत होतं, संस्कारित होत होतं.

चार भावंडं आणि आई-वडील प्रथम गावाकडून मुंबईत आले. त्यावेळेस त्यांच्या हालअपेष्टा, उपासमार सर्वच भयंकर होतं. आईवडील कॉलनीत कामाला लागल्यावर अनंत काणेकर, व. पु. काळे यांच्या सांगण्यावरून सिद्धार्थचे नाव त्यांनी शाळेत घातले. सातवीपर्यंत म्युन्सिपालिटीची शाळा व नंतर न्यू इंग्लिश स्कूलमध्ये सिद्धार्थने प्रवेश घेतला. तेव्हापासूनच सिद्धार्थला जबाबदारीची जाणीव आहे, हे पुस्तक वाचताना जाणवते. या १२ वर्षाच्या मुलाचा दिवस पहाटे ४ वाजता सुरू होत असे. दुधाच्या बाटल्या घरोघर पोचवणे, वर्तमानपत्र टाकणे, गाड्या धुणे, घराघरातून झाडू-पोछा करणे, थोडाफार अभ्यास आणि मग शाळा असा दिनक्रम असे. संध्याकाळ मात्र 'साहित्य सहवास'मधील मित्रांसोबत क्रिकेट, हॉकी आणि इतर खेळात संपून जात असे.

या मित्रांबरोबर घालवलेला प्रत्येक क्षण सिद्धार्थने मनात जपून ठेवला आहे. या मित्रांनी प्रत्येक प्रसंगात आपपरभाव न मानता त्याला मोलाची साथ दिली. सचिन तेंडुलकर आणि त्याचे कुटुंबीय यांच्याबद्दल तो भरभरून बोलत असतो. या मित्रांबरोबर गच्चीवर होणारी टाट-वाटी पार्टी, छोट्यामोठ्या सहली, गणपतीचे कार्यक्रम, ऐकलेली क्रिकेटची कॉमेंट्री, सचिनचा विजयोत्सव अशा अनेक प्रसंगांतून मैत्रीचे भावबंध अधिकाधिक दृढ होत गेले. सिद्धार्थच्या नकळत या कार्यक्रमांची वर्गणी मित्रांकडून परस्पर भरली जात असे.

'मी ग्रॅज्युएट होईपर्यंत कायम मित्रांचे कपडे वापरत आलो,' हे सांगताना सिद्धार्थला खंत वाटत नाही. मोठं होतानाचे अनेक प्रसंग वाचताना मनाला चटका लावून जातात... लहानपणी केवळ दोन रुपयांची पैज जिंकण्यासाठी



। ऐका... क्षणभर उघड नयन देवा...- राग पूरिया कल्याण ।

**प्रायोजक – श्री. गौरव सहस्रबुद्धे, डोंबिवली**

चिखलाचं पाणी पिणं, 'जेवायला थांब' म्हणतील या आशेनं अजितच्या घरात रेंगाळत राहणं, अनंत काणेकर सफरचंद देतात म्हणून त्यांच्याकडे प्रगतिपुस्तक घेऊन जाणं, क्लासची फी भरण्यासाठी सर्कसच्या दारात लिंबू सरबत विकणं, अकरा इमारतींच्या टाक्या एकट्याने धुऊन कॉलेजच्या फीसाठी पैसे जमा करणं वगैरे.

बालवयात आपला भाऊ औषधाच्या अभावाने मृत्युमुखी पडला आणि आईवडिलांना मदत करण्याच्या व्यापात बहिणींचे शिक्षण झाले नाही, याची सिद्धार्थला खंत वाटते. परंतु हे पूर्ण कुटुंबच कष्टाळू, प्रामाणिक ! धाकटा भाऊ रमेश हा गेली अनेक वर्षे सचिन तेंडुलकरचा पी. ए. म्हणून कार्यरत आहे, याचा सिद्धार्थला अभिमान वाटतो. स्वत: सिद्धार्थ एम. कॉम. झाल्यावर छोट्या मोठ्या नोकऱ्या करत 'एल. आय. सी.' मध्ये फिल्ड ऑफिसर झाला. उत्तम कामगिरीची अनेक बक्षिसे त्याने मिळवली. 'एम. आय. जी.' क्रिकेट क्लबचा तो अध्यक्ष झाला. कष्टाने माग काढत गेला. 'साहित्य सहवास'समोर त्याने सदनिका घेतली, संसारी झाला. आई-वडिलांना म्हातारपणी सुखाचे दिवस दाखवले.

प्रस्तुत आत्मचरित्रात सिद्धार्थ पारधे यांचा ४०-४५ वर्षापर्यंतचा जीवनप्रवास आहे. अशिक्षित समाजात जन्माला येऊन, प्रतिकूल परिस्थितीशी झगडत केलेला जीवनप्रवास, साध्या पण ओघवत्या भाषेत, सच्चेपणाने वाचकांसमोर मांडला आहे. यात उल्लेख केलेल्या अनेक व्यक्ती प्रथितयश असल्याने त्यांचे केलेले उल्लेख आपली पुस्तक वाचतानाची उत्सुकता वाढवतात. छायाचित्रे अधिक रंगत आणतात. या सर्व लेखनाचं आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे यात कोणाबद्दलही अनुद्गार, खंत व्यक्त केलेली नाही. जीवनाशी झगडा करताना वाईट अनुभव आले नसतील असे नाही. पण ते आठवत राहण्यापेक्षा चांगल्या आठवणींचा दरवळ मनात ठेवण्याचा लेखकाचा सकारात्मक दृष्टिकोन पुस्तक वाचताना जाणवतो.

या पुस्तकाला लाभलेली लेखक सुभाष भेंडे यांची प्रस्तावना, मलपृष्ठावरील विंदा करंदीकर यांचे शुभेच्छापत्र तसेच बाळ फोंडके, अनिरुद्ध पुनर्वसू, के. ज. पुरोहित, गिरीजा कीर, अरुण साधू आणि सचिन तेंडुलकर यांची पुस्तकाबद्दलची बोलकी प्रतिक्रिया, ही या पुस्तकातील अनमोल ठेव आहे. हे आत्मचरित्र तरुण मुलामुलींना प्रेरणा देईल असे आहे. गुरुजन, आईवडील, 'कॉलनी'तील वडीलधारी आणि मित्रमंडळी यांचा ऋणनिर्देश म्हणजे हे पुस्तक आहे.

**पुस्तकाचे नाव :** कॉलनी
**लेखक :** सिद्धार्थ पारधे
**प्रकाशक :** लक्ष्मण पारधे चॅरिटेबल ट्रस्ट
**पृष्ठ संख्या : १९२ किंमत : ₹ १७५**

**नीलिमा करमरकर**
ब-शशिकिरण, अशोक पथ,
लॉ कॉलेज रस्ता, पुणे 411004

## वेधक... विलक्षण !



'थर'च्या वाळवंटातला 'सँडग्राऊस' हा पक्षी आपल्या पिल्लांसाठी कितीही लांबून पाणी आणू शकतो. पाण्याच्या शोधात तो घरट्यापासून पन्नास किलोमीटरपेक्षाही जास्त लांब उडू शकतो. नर सँडग्राऊस छातीवरच्या पिसांमध्ये पाणी शोषून घेऊन घरट्यात येतो, तेव्हा त्याची पिल्ले चोचीने पिसांमधले पाणी ओढून घेतात आणि तहान भागवतात. यासाठी नर पक्षाला अनेक वेळा पाण्याच्या साठ्यापर्यंत फेऱ्या माराव्या लागतात.

मी गवतावरचा थेंब दवाचा झालो। मी क्षितिजावरती चंद्र होऊनी आलो।।

प्रायोजक - लक्ष्मीनारायण संस्था, डोंबिवली

# ।। वृक्षवल्ली आम्हा सोयरे...।।

**– मेधा इनामदार**

रस्त्यात मध्येच येणाऱ्या झाडाझुडपांवर काठीचे वार करीत... राहुल रमत गमत चालला होता. उगीचच एखादी लहानशी फांदी तोडायची. तर कधी एखाद्या झाडाची सहज हाताशी येतील अशी पानंच ओरबाडून काढायची... मग थोड्या वेळानं ती चुरगाळून कुठेतरी फेकून द्यायची...!! मध्येच एखाद्या फुलाचा वास घ्यायचा... मग ते उंच भिरकावून खाली पडेपर्यंत त्याच्याकडे बघत उभं रहायचं...!! तर कधी लहानसा दगड उचलून नेम धरून एखाद्या फळावर मारायचा अन् मग ते फळही भिरकावून लांब फेकून द्यायचं... असे रिकामे खेळ करीत तो निवांतपणे चालत होता. त्याच्याबरोबरचा ग्रुप... अक्षय, अनिकेत, रितेश, जय, ज्योती, रूपा... आणि अमोलदादा बोलत बोलत बरेच पुढे गेले होते. पण या झाडाझुडपांबरोबर खेळण्याच्या नादात राहुलचं तिकडे लक्षही नव्हतं.

हिंडणं-फिरणं, गप्पा-गाणी, रोजचं कँप फायर... राहुल ट्रेकमध्ये चांगलाच रमला होता. प्रत्येक काम करायलाही राहुल चटकन् पुढे असायचा. त्यामुळे इन्स्ट्रक्टर अमोलदादाचाही राहुल लाडका बनला होता. 'आई-बाबा आपली उगीच काळजी करत असतात,' राहुलच्या मनात यायचं.

आत्ता मात्र झाडाझुडुपांना काठीनं मारण्याचा खेळ खेळण्यात रंगलेला राहुल नकळतच सगळ्यांच्या मागे पडला होता. आणि कुणाच्याच ते लक्षात आलं नव्हतं...!! एक सुरेख फुलपाखरू एका रानवेलीवरच्या लहानशा फुलावर बसल्याचं त्याच्या लक्षात आलं. मधूनच ते गिरक्या घेत होतं. मध्येच अलगद फुलावर बसून मध पीत होतं. परत अवतीभोवती उडून पुन्हा त्या फुलावर बसत होतं. स्वत:शीच खेळण्यात ते फुलपाखरू अगदी रमून गेलं होतं. रेशमी, गुलाबी-जांभळ्या, चमकदार पंखांवर हिरवे आणि पिवळे ठिपके...!! राहुल भान हरपून पाहातच राहिला.

'हे छानसं फुलपाखरू पकडायचं आणि अलगद आपल्याजवळच्या डबीत ठेवायचं. सगळ्यांनाच आपला हेवा वाटेल...!' त्याच्या मनात आलं. ही तर त्याची नेहमीचीच सवय होती. शाळेतही रोज काहीतरी नवीन उद्योग करून सगळ्या मित्रमैत्रिणींना आपल्याभोवती जमवायचं हा राहुलचा आवडता उद्योग होता.

राहुल चटकन् पुढे झाला. पण ते फुलपाखरू राहुलपेक्षाही चपळ होतं. विलक्षण वेगानं ते उडालं. राहुलच्याच भोवती ते गोल गोल फिरलं. आणि मग पुन्हा पुढे जाऊन दुसऱ्या फुलावर बसलं. जसं काही ते राहुलला चिडवत होतं. राहुल पुन्हा पुढे आला. पण याही वेळा ते निसटलंच. मग मात्र राहुलला राग आला. 'एवढंसं तर पाखरू...? थांब आता बरोबर पकडतोच...' राहुल मनाशी म्हणाला. पण छे ! राहुलचे पुढचेही बरेच प्रयत्न वाया गेले. आणि मग कुठे कुणास ठाऊक ते फुलपाखरू लांब उडून गेलं. फुलपाखरू दिसेनासं झाल्यावर राहुल भानावर आला. या फुलपाखराच्या नादात तो बराच लांब आला होता. 'बापरे! बरोबरचा सगळा ग्रुप? अमोलदादा, अक्षय, अनिकेत... सगळे गेले तरी कुठे?'

त्यानं इकडे तिकडे पाहिलं. कुणीच दिसत नव्हतं. फुलपाखराच्या मागे तो किती धावला ते त्याचं त्यालाच कळलं नव्हतं. तो जिथून फुलपाखराच्या नादी लागला होता ते ठिकाण तरी कुठे होतं बरं...? स्वत:भोवतीच गोल फिरून राहुलनं अंदाज घेण्याचा प्रयत्न केला, 'छे ! काहीच लक्षात येत नाही. या बाजूला... की त्या बाजूला...? ते पिवळ्या फुलांनी भरलेलं झाड बहुतेक आपण मघाशी पाहिलं होतं...' राहुल त्या दिशेनं गेला.



। अभिनंदन - ज्येष्ठ अभिनेते मोहन आगाशे (जयंतराव टिळक स्मृती जीवनगौरव पुरस्कार)।
प्रायोजक – श्री. श्रीकांत कुलकर्णी, ठाणे

पण पुढे तर एकदम खोल दरीच दिसली.

''अमोलदादा ऽ अक्षयऽ चिन्मयऽ अनिकेतऽ!'' राहुलनं जोरजोरात हाका मारायला सुरुवात केली.

पण सगळीकडून त्याच्याच आवाजात प्रतिध्वनी आला. इतकं मोठं दाट अनोळखी जंगल... आणि राहुल एकटा...! समोर दरी आणि सगळ्या बाजूंनी अंगावर चाल करून येतील असे वाटणारे मोठे मोठे डोंगर...! राहुलला आईबाबांनी सांगितलेल्या सगळ्या सूचना आठवल्या...!!

''हे बघा, हे जंगल खूप दाट आहे. कुणीही एकटं राहू नका. आणि मुख्य म्हणजे या जंगलात वाघ, कोल्हे, अस्वलं आहे असं म्हणतात. रस्ता चुकू नका बरं...!'' अमोलदादानं निघताना पुन्हा पुन्हा बजावून सांगितलेलंही राहुलला आठवलं.

''देवा, माझं चुकलं. मी आईबाबांचं... अमोलदादाचं ऐकायला हवं होतं. माझी चूक एकदाच माफ कर. आता मला सगळेजण भेटू देत. मी पुन्हा असं कधी नाही वागणार...!'' राहुल रडवेल्या आवाजात म्हणाला.

दुपारची वेळ होती. ऊन बऱ्यापैकी तापलं होतं. राहुलच्या गळ्यातली वॉटरबॅग अर्धीच भरलेली होती. राहुलला तहान लागली. सगळेजण भेटेपर्यंत आता तेवढंच पाणी त्याला सांभाळून वापरावं लागणार होतं. राहुलला आता रडू यायला लागलं. डोळे पुसत तो तिथल्याच एका झाडाखाली बसला.

आणि काय आश्चर्य... राहुल बसला होता ते झाड चक्क तिथून हललं. आणि दुसरीकडे मोकळ्या जागी जाऊन उभं राहिलं. 'झाड चाललं...?' राहुल दचकला. 'कदाचित आपल्याला भास झाला असेल', राहुलला वाटलं. तो पुन्हा दुसऱ्या एका झाडाखाली सावलीसाठी उभा राहिला. पण पुन्हा तसंच झालं. दाट सावलीचं ते झाड माणसानं चालावं तसं हळूहळू सरकत बाजूला झालं आणि राहुलला पुन्हा उन्हाचा चटका बसायला लागला. 'बापरे ! हे काय आहे? आपण कुठे येऊन पोचलो आहोत...?' राहुलला जाम भीती वाटायला लागली.

''ए, शुक शुक...!!'' राहुलला हाक ऐकू आली. त्यानं सगळीकडे पाहिले. ''ए, मीच हाक मारली.'' समोरच्या लाल फुलांनी फुललेल्या झाडानं म्हटलं.

''पण तुला बोलता कसं येतं...?'' राहुलनं विचारलं.

''तू आमच्या जगात आला आहेस. आमच्या जगात आम्ही सारं काही करू शकतो. बोलू शकतो, नाचू शकतो, गाऊ शकतो, चालू शकतो... जसं तुम्ही तुमच्या माणसांच्या जगात वावरता तसंच आम्ही आमच्या जगात जगतो...!!'' राहुलच्या जवळ येत एक झाड म्हणालं.

''म्हणजे...?'' राहुलनं विचारलं.

''हा सगळा प्रदेश आमचा आहे. वृक्षनगर आहे हे. कुणाही माणसाला इथे प्रवेश नाही. तू आला आहेस इथे... याचा अर्थ तू आम्हा वृक्षनगराच्या वृक्षांपैकी कुणाला तरी त्रास दिला असशील... ते आमच्या वृक्षमहाराजांना कळलं असेल... आणि म्हणून...!!'' लाल फुलांचं झाड बोलता बोलता एकाएकी गप्प झालं.

दचकून राहुलनं आजूबाजूला पाहिलं. एव्हाना त्याच्याभोवती एका मोठ्या वर्तुळाकार रांगेत कितीतरी झाडं उभी राहिली होती...!! त्यात सगळ्या प्रकारची झाडं होती. राहुलच्या घराभोवती फुललेल्या कुंपणावरच्या बोगनवेलीपासून ते थेट त्याच्या शाळेच्या वाटेत असलेल्या छोट्या छोट्या उंबरांनी लगडलेल्या उंबराच्या झाडापर्यंत...!! आश्चर्य म्हणजे प्रत्येक झाडाच्या खोडावर एक एक चेहरा स्पष्ट दिसत होता.

''पण!!'' राहुलनं हे असं दृश्य कधीच पाहिलं नव्हतं.

''हाच! महाराज हाच तो मुलगा...! यानंच माझी पानं ओरबाडली... आणि फेकून दिली. काही कारण नसताना...!'' एक झाड पुढे येत म्हणालं. त्याच्या एका फांदीवरची सगळी पानं अर्धवट तोडलेली होती.

''...आणि महाराज, मी तर एका बाजूला निमूटपणे बसलो होतो. या मुलाच्या रस्त्यातही नव्हतो... पण जवळ येऊन माझ्यावरून चालत, मला तुडवून पुढे निघून गेला हा मुलगा...! माझ्या वेदना... आई गं...!'' आपलं आक्रसलेलं शरीर आणखी संकुचित करीत म्हणालं, आणखी एक रोप.

''आणि महाराज, माझी फांदी मोडून तिचेच वार

झाडे राने उंच उडविती पर्णांतून पताका ।
शाखाशाखांतून टाकिती सुखसंतोष शलाका ।।

आपल्या साऱ्या भाऊबंदांवर करीत होता हा इतका वेळ! ती पाहा ती अजूनही माझी फांदी त्याच्या हातात आहे !!'' राहुलनं घाबरून हातातली काठी टाकून दिली.

'झाडं हलत नाहीत की बोलत नाहीत. त्यांना कसला आलाय जीव...? झाडांना काय कळतंय्...?' राहुल नेहमीच म्हणायचा. पण आज इथे तो काही निराळंच अनुभवत होता. एकेक झाड राहुलबद्दलच्या तक्रारी सांगत होतं.

''...तर तू ऐकलंसच, तुझ्याबद्दल आम्हा वृक्षांच्या किती तक्रारी आहेत...! आणि चुकीला शिक्षा हा निसर्गाचा न्याय आहे...!''

''हो ! हो ! शिक्षा... शिक्षा...!'' सगळी झाडं एका सुरात ओरडली.

''गरज नसताना गंमत म्हणून तू वृक्षांना त्रास देतोस होय ना...?''

राहुल काहीच बोलला नाही. ''इकडे ये.'' राहुलसमोर उभ्या असलेल्या त्या महावृक्षानं म्हटलं. घाबरलेल्या राहुलचे पाय जसे जमिनीला खिळून बसले होते.

पाहाता पाहाता त्या महावृक्षानं त्याची एक फांदी लांब पसरली आणि अलगद राहुलच्या डोक्याला त्या फांदीनं स्पर्श केला. अचानक गार वारा सुटल्यासारखं राहुलला वाटलं. आणि क्षणातच आपल्या डोक्यातून झाड उगवतंय की काय असा भास त्याला होऊ लागला. त्यानं डोक्याला हात लावायचा प्रयत्न केला. पण बाप रे! त्याचे हात होतेच कुठे...? हाताच्या जागी लांब लांब फांद्या होत्या. आणि त्याच्यावर नवी कोवळी





। दिनविशेष : १० डिसेंबर - जागतिक मानवी हक्क दिन।

**प्रायोजक - श्री. अजित परांजपे, पुणे**

कोवळी पोपटी रंगाची पानं होती.

''आता आपलंदेखील झाड झालं...! आता आपण या जंगलातून कधीच बाहेर नाही जाऊ शकणार.''

राहुलला आपलं घर आठवलं. आई-बाबा... मित्र मैत्रिणी... शाळा... सगळ्यांची आठवण आली. पण त्याच्या डोळ्यातून वाहणारं पाणी पुसायला त्याला हात होते कुठे...? पानांनी डोळे कसे पुसणार...?

''राहुल, तुझ्याजवळ सगळं काही आहे, हुशारी आहे, बुद्धिमत्ता आहे. फक्त दुसऱ्याला त्रास देऊन गंमत करायचा हा स्वभाव सोडून दे राजा. हे चांगलं नाही. पुढे कधीतरी या वागण्यानं तू संकटात सापडशील.'' राहुलची आई त्याला नेहमी सांगायची. कुत्र्याच्या पिल्लाची शेपूट ओढ... मांजरीला उंच उचलून खाली टाकून दे... झाडावर निमूट बसलेल्या एखाद्या पक्ष्याला दगड मार...! हे त्याचे उद्योग तिला मुळीच आवडत नसत.

आणि राहुलला आज तेच सारं भोवलं होतं. एका फुलपाखरानं फसवून त्याला झाडांच्या राज्यात आणलं होतं. ज्या झाडांच्या फांद्या तोडून तो खेळ करायचा; ती सगळी झाडं त्याच्या तक्रारी सांगत त्याच्यापुढे उभी होती. आणि आता



वर्षातून एकदा तरी वाट धरावी मातीची ।
विसरून जावं सगळं आणि सूर जुळावे रानाशी ॥

राहुलच एक झाड बनला होता.

''तुम्ही त्याला शिक्षा करू शकता,'' वृक्षराजानं इतर झाडांकडे पाहून म्हटलं.

तसं सगळी झाडं राहुलच्या जवळ आली. त्याच्या फांद्या ओढू लागली... त्याच्या डोक्यावर टपला मारू लागली. राहुलला वेदना होऊ लागल्या.

''मला... मला खरंच माहिती नव्हतं... तुमच्या फांद्या तोडल्यावर तुम्हाला असा त्रास होत असेल. मला क्षमा करा. माझं चुकलं.'' राहुल म्हणाला.

''सोडून द्या त्याला'', वृक्षराजानं आज्ञा दिली. त्यासरशी सगळे वृक्ष हळूहळू मागे सरकू लागले.

''फक्त इतकीच शिक्षा...?'' राहुलनं पानं ओरबाडलेल्या एका झाडानं रागानं विचारलं. ''हा माणूस सारं विसरलाय. स्वत:चा स्वार्थ साधण्याच्या नादात आपला नाश करीत चाललाय् तो...! त्याला लगेच माफ करायचं...?''

''मुळातच आपण वृक्ष क्षमाशील आहोत हे विसरू नकोस...! माणसानं दगड मारला तरी त्याला फळं देणारे आपण... या मुलाला त्यानं केलेल्या अपराधाबद्दल इतकी शिक्षा पुरे. त्याची चूक त्याला आता कळली असेल.'' वृक्षराज म्हणाले.

''होय ! वृक्षराज, माझी चूक मला कळली आहे.'' राहुल खोल आवाजात म्हणाला. त्याच्या फांद्या ओढल्यानं त्याचं सगळं अंग दुखत होतं. शिवाय पानं ओरबाडल्यानं उघड्या पडलेल्या भागावर जखमा झाल्यासारखी आग आग होत होती. झाडांनाही जीव असतो, त्यांनाही वेदना होतात हे राहुल स्वत:च अनुभवत होता. तो म्हणाला, ''मी यापुढे कधीच कुठल्याच झाडाला त्रास देणार नाही.''

''आणि चूक एकट्या या मुलाची... राहुलची नाही... साऱ्या मानवजीतीची आहे...! आज हा मुलगा आपल्या राज्यात आला म्हणून आपण त्याला त्याच्या चुकीची जाणीव करून द्यायची ठरवलीय्.'' मग राहुलकडे वळून वृक्षराज गंभीरपणे बोलायला लागले...

''हे बघ राहुल... फार फार वर्षांपूर्वी... म्हणजे जेव्हा परमेश्वरानं हे जग बनवलं तेव्हाच त्यानं आपल्याला म्हणजे मानवाला आणि आम्हा वृक्षांना मिळून मिसळून राहायला सांगितलं होतं. दोघांनी एकमेकांना मदत करायची आणि हे जग सुंदर करायचं असं परमेश्वरानं आम्हाला सांगितलं होतं. त्याप्रमाणे आम्ही माणसांना सूर्याच्या उन्हापासून वाचवायचं, सावली द्यायची, माणसांची भूक भागवायची, त्यांना अन्न वस्त्र निवारा पुरवायचा आणि माणसांनी आमची काळजी घ्यायची, आम्हाला प्रेमानं वाढवायचं, खतपाणी पुरवायचं असं ठरलं होतं. काही काळ माणसानं तसं केलंही. पण आता मात्र आम्ही असं अनुभवतोय् की कारण नसताना माणसं आमची हत्या करतात, आमच्या फांद्या तोडतात, पानं ओरबाडतात, फुलं कुस्करतात. आमची काळजी तर घेत नाहीतच उलट आमची जंगलंच्या जंगलं उद्ध्वस्त करून तिथं सिमेंटची शहरं बांधतात. अरे ! जंगलातले हिंस्र प्राणीसुद्धा भूक नसली तर शिकार करत नाहीत. पण तुम्ही माणसं काहीही कारण नसताना झाडं तोडता... प्राण्यांच्या हत्या करता...!''

राहुल वृक्षराजाचं बोलणं मनापासून ऐकत होता.

''तुमच्या या वागण्यानं आम्ही तर नष्ट होऊच. पण त्यापेक्षाही तुम्ही तुमचाच नाश करताहात हे लक्षात घ्या. झाडं नाहीशी झाली तर सर्वत्र रखरखाट होईल. पाऊस पडेनासा होईल. प्राणी बेघर होतील. हिंस्र प्राणी... वाघ सिंह अन्नाच्या शोधात शहरात शिरतील. तुम्हा लोकांना पाणी तर मिळणार नाहीच पण पाण्यापासून तुम्ही जी वीजनिर्मिती करता तीही बंद होईल... तुमच्या पुढारलेल्या जगात वीजेवर किती गोष्टी अवलंबून आहेत..? सगळ्या जगाच्या नाड्याच आखडल्यासारखे होईल.''

किती खरं सांगत होते वृक्षराज! सध्या चाललेल्या लोडशेडिंगनं होणारा त्रास तर राहुल रोजच अनुभवत होता. बघता बघता राहुलला पुढचं विजेशिवायचं रखरखीत जग दिसायला लागलं. शिवाय जंगलं नसल्यामुळे गावात शिरून माणसांवर हल्ला करणारे प्राणी...! सगळंच असुरक्षित... आणि भयंकर...! आणि हे सगळं आपण स्वत:च घडवून आणतोय्...



। आदरांजली... ज्येष्ठ गायक व संगीतकार - भूपेन हजारिका (५ नोव्हेंबर २०११)।

प्रायोजक – श्री. विद्याधर सहस्रबुद्धे, डोंबिवली

अविचारानं... राहुलच्या मनात आलं, ‘आपण खेळ म्हणून या झाडाझुडुपांना त्रास देतो... आणि इतर कितीतरी जण...? छे ! हे खरंच चुकीचं आहे...!!’’

‘‘वृक्षराज... माझी चूक मला कळलीय. यापुढे मी झाडांचं रक्षण करीन. कुणालाही झाडं तोडू देणार नाही.’’ राहुल म्हणाला.

‘‘...आणि गरज म्हणून झाड तोडायची वेळ आलीच तर त्याऐवजी दोन रोपं लावीन मी. माझ्या मित्रांनाही तेच सांगीन...!’’

‘‘आता राहुलला माफ करायला कुणाची हरकत नाही ना?’’ वृक्षराजांनी विचारलं.

‘‘नाही ! नाही ! त्याला माफ केलंय आम्ही !’’ सगळेजण एका सुरात म्हणाले!

‘‘पण त्यानं आपल्याला तसं वचन दिलं पाहिजे आणि मुख्य म्हणजे दिलेलं वचन पाळलं पाहिजे... नाहीतर...!’’ एक उंच निलगिरीच्या झाडासारखं दिसणारं झाड म्हणालं.

‘‘नक्कीच! मी वचन देतो.’’ राहुल म्हणाला.

वृक्षराजानं आपल्या लांब फांद्यांनी पुन्हा एकदा राहुलला स्पर्श केला. गार वारं सुटल्याचा भास राहुलला झाला आणि काही क्षणातच त्याला जाणवलं त्याचे हात अगदी पहिल्यासारखे झाले आहेत... हातातून... पायातून... उगवलेल्या फांद्या आणि पानं... सगळं नाहीसं झालं होतं...!!

‘‘थॅंक्स! मी दिलेलं वचन नक्की पाळीन वृक्षराज...! पण माझे मित्र... मी हरवलो आहे हो,’’ राहुल व्याकुळ होऊन म्हणाला.

‘‘काही काळजी करू नकोस.’’ असं म्हणून वृक्षराजांनी राहुलला अलगद उचललं. त्यांचे हात लांब पसरू लागले. आकाशातून वेगाने आपण जातो आहोत असं जाणवल्यानं राहुलनं डोळे गच्च मिटून घेतले.

‘‘कसलं वचन? काय बोलतो आहेस राहुल...? राहुलऽ राहुलऽ डोळे उघड...’’ राहुलनं डोळे उघडले. अमोलदादा आणि सगळेच राहुलच्या समोर उभे होते!!

आपण अनुभवलं ते स्वप्न की सत्य...? राहुलला कळेना! आपण या झाडाखाली झोपलो होतो की काय? त्यानं इकडे तिकडे पाहिलं. समोरच्या पिवळ्या फुलांच्या झाडावरचा एक चेहरा त्याच्याकडे बघून हळूहळू अस्पष्ट होत चाललेला त्याला दिसला...!

‘‘अं हं ! काही नाही. चला...! कदाचित मला झोप लागली असेल. मी रस्ता चुकलो होतो ना... मग तुमची वाट पाहात इथंच बसून राहिलो...!!’’ राहुल म्हणाला.

‘‘तरी मी कितीदा बजावलं होतं. सगळे एकत्रच राहा म्हणून. आत्ता आम्ही किती पुढे गेलो होतो माहितीय? अचानक रोहनच्या लक्षात आलं म्हणून आम्ही परत मागे आलो...!! आम्ही येईपर्यंत काही भलतं झालं असतं तर...?’’ अमोलदादा काळजीनं म्हणाला. ‘‘चला आता... आधीच उशीर झालाय्...!’’

‘‘...हो हो चला चला. भूक पण लागलीय्!’’ खादाड अंबरीशनं सगळ्यांना भुकेची जाणीव करून दिली. आणि सगळे निघाले.

चालताना अक्षयनं उगीचच हाताशी आलेली फांदी गदागदा हलवली. फुलांचा सडा खाली पडला.

‘‘काय हे अक्षय उगीचच झाडांना त्रास कशाला देतोस...? झाडंही आपल्यासाखीच आहेत. त्यांनाही जीव आहे. भावना आहेत. त्यांनाही वेदना होतात. दुःख होतं आणि आनंदही होतो...! हे वृक्षच तर आपले खरे मित्र आहेत... आपण त्यांची काळजी घ्यायला हवी....!!’’

‘‘अरे वा ! राहुल! एकदम एवढा बदल? बरं वाटलं मला! तुझ्यातला हा बदल पाहून तुझ्या आईला नक्की आनंद होईल बघ!!’’ अमोलदादा म्हणला.

राहुलनं इकडे तिकडे पाहिलं. समोर अजूनही वृक्षराज उभे आहेत हे त्याच्या लक्षात आलं. त्यानं निरोपाचा हात हलवला. आणि मग सगळ्याच झाडांनी हात हलवून त्याला निरोप दिला.

‘‘एकदम कसं काय एवढं वारं सुटलंय...? जरा सांभाळून हं...!’’ अमोलदादा म्हणाला.

या वाऱ्याचं गुपित फक्त राहुललाच माहिती होतं...

❋ ❋

**– मेधा इनामदार**

ए २-३४, महिम्न सोसायटी, कर्वेनगर, पुणे 411052

पहा तरी निसर्गाचा साजरा सोहळा।
साद घाली रानवारा, सहलीला चला ॥

## संस्कृत प्रहेलिका

(खालील संस्कृत सुभाषितांमधल्या कोड्यांची उत्तरं येतायत का तुम्हाला?)

**अस्थि नास्ति शिरो नास्ति बाहुरस्ति निरङ्गुलिः ।**
**नास्ति पादद्वयं गाढम् अङ्गमालिङ्गति स्वयम् ।। १ ।।**

अर्थ - ज्याला हाड नाही, डोकंही नाही, (परंतु) बोटे नसलेला हात आहे. ज्याला दोन्ही पाय नाहीत (पण) आपल्या शरीराला जो घट्ट आलिंगन देतो, असा तो कोण बरे?

**एकचक्षुर्न काकोऽयं बिलमिच्छन्न पन्नगः ।**
**क्षीयते वर्धते चैव न समुद्रो न च चन्द्रमाः ।। २ ।।**

अर्थ - ज्याला एकच डोळा आहे, पण तो कावळा नाही. जो बिळात जाऊ इच्छितो पण तो साप नाही. जो सतत वाढत असतो आणि कमीही होत असतो, पण जो समुद्र नाही, किंवा चंद्रही नाही असा तो कोण?

**पर्वताग्रे रथो याति भूमौ तिष्ठति सारथिः ।**
**चलति वायुवेगेन पदमेकं न गच्छति ।। ३ ।।**

अर्थ- ज्याचा रथ पर्वतांच्या शिखरावर जातो. तरीही ज्याच्या रथाचा सारथी जमिनीवरच उभा असतो. जो वाऱ्याच्या वेगाने चालतो, पण एवढे असूनही त्याचे एकही पाऊल पुढे पडत नाही असा कोण?

**रविजा शशिकुन्दाभा तापहारी जगत्प्रिया ।**
**वर्धते वनसङ्गेन न तापी यमुनापि न ।। ४ ।।**

अर्थ - ‘रवी’पासून निर्माण झालेले, चंद्राच्या प्रकाशासारखे शुभ्र रंगाचे, ताप हरण करणारे, सर्व जगाला प्रिय असलेले, पाण्याच्या सहवासाने वाढणारे पण तापी नदी नव्हे किंवा यमुना नदीसुद्धा नव्हे; असे ते काय?

**वृक्षाग्रवासी न च पक्षिजातिः । तृणं च शय्या न च राजयोगी ।**
**सुवर्णकायो न च हेमधातुः । पुंसश्च नाम्ना न च राजपुत्रः ।। ५ ।।**

अर्थ- वृक्षाच्या टोकावर राहतो पण तो पक्षी नाही; त्याच्यासाठी गवताचा बिछाना आहे, पण तो कुणी राजयोगी नाही. त्याचा देह सोन्याचा आहे, पण तो म्हणजे काही सोने हा धातू नाही. नावाने पुरुष आहे पण राजपुत्र नाही, असा कोण?

(उत्तरे अन्यत्र)

**संकलन – भक्ती कापरे**

## गंप्याचे बिल गेट्सला पत्र

गंप्याने बिल गेट्सला पत्र पाठवलं. बिल गेट्सला या पत्रातील प्रश्नांना काय उत्तरं द्यावीत असा प्रश्न पडलाय. पाहा बरं तुम्हाला काही उत्तरं सुचतायत का?

* कळपाटावरील (कीबोर्ड) अक्षरे अनुक्रमे का नाहीत? ती a,s,d,f अशी वेडीवाकडी का आहेत? या कीबोर्डची सुधारित आवृत्ती (a,b,c,d प्रमाणे) कधी सादर करणार आहात?
* त्या कीबोर्डवर ‘स्टार्ट’ चे बटण आहे; पण ‘स्टॉप’ करण्याचे का नाही?
* माझ्याकडे आपले Ms 'word' आहे, Ms 'sentence' कधी बाजारात येईल?
* संगणकावर 'Re cycle Bin' आहे 'Re scooter Bin' का नाही?
* एक वैयक्तिक प्रश्न– आपले आडनाव ‘गेट्स’ असूनही आपण ‘विंडोज’ का विकता?





। दात मजबूत राखण्यासाठी दातांची नियमित निगा राखा ।
प्रायोजक – डॉ. कीर्ती आपटे, पुणे ☎ २६६८४२०१

(४) प्रकल्पांची कमाल शिकण्यातली धमाल

# प्रकल्पवृत्त नव्हे प्रकल्पाचा आरसाच जणू

**विवेक पोंक्षे**

प्रकल्पाची धमाल 'प्रकल्प करण्यात'असते. प्रयोग करा, संदर्भ वाचा, आलेख काढा, चर्चा करा हे पुन्हा पुन्हा करत राहावे लागते आणि त्यात गंमत असते. प्रतिकृती (model) करताना तर इतक्या चुका होतात की विचारू नका! पण चुकण्यात गंमत असते. चुकता चुकता शिकणे, हाच तर प्रकल्प पद्धतीचा विशेष आहे. पण प्रकल्पाची एक खासियत आहे. सुरुवात नेहमी संथ लयीत होत असते आणि जसजसा शेवटचा दिवस, 'डेडलाईन' जवळ यायला लागते तशी घाई व्हायला लागते. रात्र थोडी आणि सोंगे फार अशी स्थिती तयार होते. खूप माहिती गोळा झालेली असते. त्यातली उपयोगाची, महत्त्वाची माहिती निवडायची; तिचा अर्थ लावायचा; त्यातून निष्कर्ष - अनुमान काढायचे. त्या माहितीची योग्य मांडणी करायची. हे सारे करायला फारच थोडा वेळ शिल्लक राहिलेला असतो. विशेषत: एखाद्या प्रकल्प स्पर्धेसाठी प्रकल्प पाठवायचा असेल तर ही वेळेची कसरत अवघड होते.

ही शेवटची धावपळ टाळायची असेल तर प्रकल्पाच्या काळात नीट जपायची, वापरायची गोष्ट म्हणजे 'प्रकल्प दैनंदिनी' अर्थात 'लॉग बुक'! अनेक स्पर्धांमध्ये प्रकल्पांच्या जोडीने परीक्षक हे 'लॉगबुक' पाहायला मागतात. हे लॉगबुक म्हणजे प्रकल्प काळातील तुमच्या वैचारिक आणि प्रत्यक्ष कृतींचा आरसाच असतो. सुचलेल्या कल्पना, वापरलेले संदर्भ, काढलेली टिपणे, रेखाटलेल्या आकृत्या आणि चित्रे, मित्र-मैत्रिणींबरोबर केलेल्या चर्चा आणि मार्गदर्शकांनी दिलेल्या 'टिप्स'! एक ना अनेक गोष्टींची नोंद लॉगबुकमध्ये नोंदवली जाते. हे सगळे कच्चे, प्राथमिक काम असले तरी त्याचे खरे महत्त्व जाणवते ते प्रकल्पाचे वृत्त लिहायला घेतले की! शेवटी प्रकल्प सादर करायच्या वेळी प्रकल्प प्रकारानुसार बऱ्याच गोष्टी सादर कराव्या लागतात. बहुतेक वेळा प्रतिकृती (model), प्रयोगरचना दाखवणारी उपकरणे, तक्ते या बरोबरच लेखी वृत्त (Written report) आणि प्रकल्पाचा सारंश (Abstract) या दोन महत्त्वाच्या गोष्टी सादर कराव्या लागतात.

आपण प्रकल्प काय आणि कसा केला हे पारदर्शिका (slides) आणि तक्ते (chart) यांच्या साहाय्याने आपण परीक्षकांना आणि प्रेक्षकांना सांगत असतो; पण त्याची तपशिलवार माहिती प्रकल्प वृत्तात असते. त्यामुळे प्रत्यक्ष प्रकल्प करणे जितके महत्त्वाचे आहे, तितकेच प्रकल्पवृत्त लिहिणेही महत्त्वाचे असते.

प्रकल्प वृत्त हे तुम्ही घेतलेल्या कष्टाचे, केलेल्या कामाचे खरेखुरे चित्र दाखवणारे असले पाहिजे. वाचणाऱ्याला तुम्ही काय काय केले हे थोडक्यात, पण अचूक कळले पाहिजे. प्रकल्प वृत्त लिहिण्याच्या सर्वसाधारण आराखड्यात खालील मुद्दे असले पाहिजेत.

✻ शीर्षक पृष्ठ ✻ कृतज्ञता ✻ सारांश
✻ अनुक्रमणिका ✻ प्रस्तावना ✻ प्रकल्प विषयाबाबत
✻ प्रकल्पाची उद्दिष्टे/शोध प्रश्न/परिकल्पना किंवा गृहितके
✻ माहिती मिळवण्याच्या पद्धती
✻ मिळवलेल्या माहितीतील महत्त्वाचे मुद्दे, निरीक्षणे यांची नोंद व चर्चा
✻ निष्कर्ष ✻ भविष्यातील काम/विस्तार इ.

लिहायचे आहे आम्हा, सारे वाचायचे आहे।
शाळेमध्ये जाऊनिया, खूप शिकायचे आहे।।

▪ संदर्भ सूची

आता यातील प्रत्येक मुद्द्याचा अर्थ थोडक्यात समजावून घेऊया.

▪ **शीर्षक पृष्ठ -** कोणत्याही प्रकल्पाचे मुखपृष्ठ आपण चित्रमय करू शकता. तुमच्या गटातील कलाकार मित्राने/मैत्रिणीने ते तयार करावे. मुखपृष्ठावरील मजकूर आणि चित्रांचा सूचक संबंध तुमच्या विषयाशी असला पाहिजे. झेरॉक्स किंवा डाउनलोड केलेल्या चित्रांपेक्षा स्वत: केलेली चित्र-मजकूर रचना प्रभावी ठरते. मुखपृष्ठानंतरचे पान अर्थात **प्रकल्प शीर्षकाचे पान** असते. या पानावर प्रकल्पाचा विषय नेमक्या भाषेत आला पाहिजे. त्याचबरोबर प्रकल्प करणाऱ्या गटातील सगळ्यांची नावे, इयत्ता, तुकडी, मार्गदर्शकाचे नाव यांसारखे तपशील असले पाहिजेत. तसेच हा प्रकल्प तुम्ही एखाद्या स्पर्धेसाठी सादर करणार असाल तर त्या स्पर्धा योजणाऱ्या संस्थेचे नाव आणि शैक्षणिक वर्षाचा उल्लेख करणे चांगले.

▪ **कृतज्ञता -** त्यानंतर येते ते ऋणनिर्देश अथवा कृतज्ञता व्यक्त करण्याचे पान. या पानावरील मजकुरातून तुम्ही अनेकांच्या आधाराने, मदतीने प्रकल्प पूर्ण केला आहे हे व्यक्त व्हावे. ज्यांचा तुमच्या प्रकल्पाशी दूरान्वयानेही संबंध नाही, अशा व्यक्तींचा नामोल्लेख करू नका. परंतु तुम्हाला मदत करणाऱ्या प्रयोगशाळा साहाय्यक, ग्रंथालय साहाय्यक यांचा आवर्जून उल्लेख करा. तुम्ही शाळेव्यतिरिक्त ज्या संस्थांची, व्यक्तींची मदत घेतली आहे त्यांचा कृतज्ञतापूर्वक उल्लेख करा.

▪ **सारांश -** सारांश कसा लिहावा याबाबत वेगळे स्वतंत्र लेखन केले जाणार आहे. ते तेव्हा पाहू.

▪ **अनुक्रमणिका -** अनुक्रमणिका लिहिताना प्रकरणांची शीर्षके तर लिहाच; पण त्याबरोबर पृष्ठक्रमांक लिहायला विसरू नका.

▪ **प्रस्तावना -** प्रस्तावना लिहिताना प्रकल्प का करावासा वाटला, काही विशेष अनुभव आले का याबाबत थोडक्यात लिहावे.




▪ **प्रकल्प विषयाबाबत,** ▪ **प्रकल्पाची उद्दिष्टे/शोधप्रश्न/परिकल्पना किंवा गृहितके -** या प्रकरणात प्रकल्प विषयाचे महत्त्व, हेतू आणि प्रकल्पाची व्याप्ती याबाबत लिहिणे आवश्यक आहे. प्रकल्पाचा आराखडा थोडक्यात याच प्रकरणात आला पाहिजे. त्याचबरोबर प्रकल्पाची उद्दिष्टे, शोधप्रश्न मांडलेल्या परिकल्पना (Hypotheses अथवा गृहितके) यांचीही नोंद या प्रकरणात करावी. काही विशेष शब्दांचा, संकल्पनांचा तुमच्या मनातील अर्थ, व्याख्या यांचीही नोंद करा.

▪ **माहिती मिळवण्याच्या पद्धती -** संपूर्ण वृत्तात सर्वात महत्त्वाचे प्रकरण म्हणजे प्रकल्पात मिळालेल्या माहितीबाबतचे असते. प्रकल्प जर ग्रंथालयाचा उपयोग करून केलेला असेल (उदा. भाषा विषयातील रसग्रहणात्मक प्रकल्प) तर पुस्तके - नियतकालिके - मुलाखती यांतून मिळवलेल्या माहितीतील महत्त्वाचे मुद्दे या प्रकरणात येतील. संशोधनात्मक प्रकल्पात वापरलेल्या पद्धतींची नोंद येथे करायला हवी. म्हणजे केलेले प्रयोग, सर्वेक्षण, प्रतिकृती (model) तयार करण्याची पद्धत यांसारख्या गोष्टी थोडक्यात येथेच लिहिणे आवश्यक आहे. या सगळ्यांतून लक्षात आलेली निरीक्षणे, तक्त्यांमध्ये (Tables) मांडणे, आवश्यक तेथे आलेख काढणे, हेही याच प्रकरणात आले पाहिजे. प्रतिकृतींचे आराखडे व प्रकाशचित्रे; प्रयोगांच्या मांडणीच्या आकृत्या, प्रकाशचित्रे; आवश्यक तेथे नकाशे यांसारख्या बाबीही या प्रकरणात येतात.

▪ **मिळवलेल्या माहितीतील महत्त्वाचे मुद्दे, निरीक्षणे यांची नोंद व चर्चा-** या प्रकरणात मांडलेली माहिती संख्यात्मक आणि गुणात्मक-वर्णनात्मक अशी असू शकते. सगळ्यात महत्त्वाचे म्हणजे या माहितीची चर्चा केली पाहिजे. विशेष निरीक्षणे, लक्षात आलेला



। ऐका... कबिराचे विणतो शेले - गीतकार ग. दि. माडगूळकर - गायिका माणिक वर्मा।
प्रायोजक – श्री. सुधीर विष्णु दफ्तरदार, पुणे

बदलाचा कल, नियमात न बसणारी उदाहरणे, अपवाद याचीही चर्चा आवश्यक ठरते.

▯ **निष्कर्ष -** हे प्रकरण निष्कर्षांची मांडणी करणारे असते. हे निष्कर्ष प्रकल्पाची उद्दिष्टे, शोधप्रश्न किंवा परिकल्पना यांना अनुसरून मांडले पाहिजेत. जे जे दिसले, अनुभवले ते स्पष्टपणे मांडले पाहिजे. एखादा निष्कर्ष मनासारखा आला नाही तरी तो जसा आला तसा लिहिला पाहिजे. संकलित केलेल्या माहितीवर स्वत:च्या भाषेत अभिप्रायात्मक लेखन केले पाहिजे. आपण काढलेल्या निष्कर्षांच्या मर्यादा आणि त्यात कोणत्या त्रुटी असू शकतील, याचीही नोंद याच प्रकरणात लिहिली पाहिजे.

▯ **भविष्यातील काम आणि विस्तार -** शेवटच्या प्रकरणात या प्रकल्प विषयाचा भविष्यात आणखी कसा विचार करता येईल, विस्तार करता येईल याची चर्चा करावी. या विषयाशी संबंधित आणखी कोणते नवे प्रश्न किंवा विषय सुचले, हेही या प्रकरणात लिहायचे आहे.

▯ **संदर्भसूची -** यानंतर संदर्भसूची आणि परिशिष्टे हा प्रकल्पवृत्ताचा शेवटचा भाग असतो. संदर्भसूचीमध्ये दोन प्रकार असतात. एक म्हणजे या विषयासंदर्भात उपयुक्त विविध पुस्तके, संकेस्थळे यांची यादी. दुसरे म्हणजे आपण प्रत्यक्ष जे संदर्भ वापरले अशा पुस्तके - नियतकालिके - संकेतस्थळे यांची यादी. ही यादी लिहिताना लेखकाचे/संपादकाचे नाव, पुस्तकाचे/ नियतकालिकाचे नाव, प्रकाशक, प्रकाशन वर्ष व पृष्ठ क्रमांक यांचीही नोंद याच क्रमाने लिहावी. संकेतस्थळाचा संपूर्ण पत्ता लिहावा. केवळ 'गुगल' असे 'सर्च इंजिन'चे नाव लिहू नये.

**परिशिष्टांमध्ये** मुख्यत: ज्या गोष्टी प्रकल्प वृत्तात देता येणार नाहीत, अशांच्या प्रातिनिधिक नमुन्याचा समावेश करावा. उदा. प्रयोगात तयार झालेले नमुने, सर्वेक्षणात प्रश्नावल्या किंवा मुलाखतीतील नमुना प्रश्न, प्रतिकृतीमध्ये प्रतिकृती करताना सुचलेल्या पर्यायी कल्पना इ.

प्रकल्पवृत्त लिहिताना आपल्याला मोठ्ठे पुस्तक लिहायचे नाही हे लक्षात ठेवले पाहिजे. त्यामुळे सारा मजकूर थोडक्यात पण मुद्देसूद असावा. शोध प्रकल्प करत असताना वस्तुनिष्ठता खूप महत्त्वाची असते. त्यामुळे बऱ्याचदा लेखन करताना मी/आम्ही असे केले असे लिहिण्याऐवजी प्रकल्पकर्त्यांनी अमूक - अमूक केले असे लिहिण्याचा प्रघात आहे. शक्यतो मी - आम्ही अशी आत्मनेपदी भाषा न वापरता तृतीय पुरुषी भाषा वापरावी. जेथे अन्य व्यक्तींचे लेखन, प्रकाशचित्रे, चित्रे, आराखडे इ. वापरले आहेत, तेथे त्यांचा नामोल्लेख केला पाहिजे. सगळेच वृत्त शक्यतो भूतकाळात लिहावे. भाषा आणि कला विषयांतील रसग्रहण किंवा चिकित्सात्मक प्रकल्पांत आत्मनेपदी भाषा किंवा स्वत:ची मते मांडायला हरकत नाही.

प्रकल्पवृत्ताची भाषा साधी-सोपी असावी. फक्त परीक्षकांसाठी आपण वृत्त लिहीत नाही तर तुमचे आई-वडील, मित्र-मैत्रिणी यांनाही ते वृत्त वाचून तुमचे काम समजले पाहिजे, आवडले पाहिजे. असे झाले तर प्रकल्प करण्याचा आनंद द्विगुणित होईल.

❋ ❋

**– प्रा. विवेक पोंक्षे**
ज्ञान प्रबोधिनी शैक्षणिक साधन केंद्र,
विनायक भवन, ५१४ सदाशिव पेठ, पुणे 30
vivek.ponkshe@jnanaprodhini.org

**तुमचा मानसपट काढून हवाय?**
मग आजच नोंदणी करा.
**मानसपट (Psychoprofile)** म्हणजे
मुलांच्या व्यक्तित्वगुणांची ओळख होण्यासाठीच्या चाचण्या,
मुलांची बुद्धिमत्ता, गुण, बलस्थाने, कमतरता यांची
ओळख होण्यास मदत करणाऱ्या चाचण्या
**चाचणी दिनांक :** १० व ११ डिसेंबर २०११
२१ व २२ जानेवारी २०१२
**वयोगट :** इ. ५ वी ते ९ वी साठी, मराठी/इंग्रजी माध्यम
**शुल्क :** रु. ६००/-
**नावनोंदणीसाठी संपर्क : सौ. ज्योत्स्ना जोशी**
प्रज्ञा मानस संशोधिका, ज्ञान प्रबोधिनी, पुणे – ३०
दूरभाष – ०२०– २४२०७१४५ (कार्यालयीन वेळेत)

# १ चित्रगोष्टी

**– चित्रा वैद्य**

*लहानपणी आपल्या सगळ्यांनाच 'चित्रकले'चा नाद असतो. बरोबर ना? आजही खडू-पेन्सिल-कागद-पाटी-घराच्या भिंती- जे काही समोर असेल त्यावर गिरगिट्या ओढणे, ही लहान मुलांची कृती पाहताना मौज वाटते. आपणही या रंगात रंगून जावं असं वाटत राहतं.*

*चित्र, त्यांचे प्रकार, त्यातली रंगसंगती, चित्र काढतानाचे काही अनुभव, चित्रांचा संस्कार, या सगळ्या 'चित्र'गोष्टींबद्दल शाळेच्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणाऱ्या, प्रसिद्ध चित्रकार चित्रा वैद्य आपल्याशी अंकातून संवाद साधणार आहेत. चित्रकलेच्या परीक्षांना ज्यांना बसायचं आहे, त्यांना तर याचा उपयोग होईलच; पण तुम्हा आम्हा सर्वांनाच या अभिव्यक्तीच्या प्रभावी माध्यमाची ओळख पटेल, परिचय होईल, असा विश्वास वाटतो. शिवाय आपणही चित्रातून व्यक्त व्हावं असं वाटेल. या 'चित्रगोष्टीं'ची सुरुवात होतीये चित्राताईंच्या चित्रकला प्रवासापासून...*

कला शिकण्यासाठी वयाची अट असते का? तुम्हाला काय वाटतं? माझ्या मते तरी आपल्याला वाटेल तेव्हा आपण एखादी कला शिकू शकतो. अगदी लहान आणि वृद्ध माणसालाही कलेतून मिळणारा आनंद अवर्णनीय असाच असतो.

माझ्या चित्रकलेचा विचार केला तर मन भूतकाळात रेंगाळू लागतं... म्हणजे अगदी तुमच्या वयाची असताना जेव्हा मी शाळेत होते... मला शाळेतला कुठला दिवस आवडायचा माहितीये? ज्या दिवशी आमचा चित्रकलेचा तास असे तोच ! त्या दिवशी मी कधीच शाळा बुडवली नाही.

मला चित्रं काढायला खूप आवडायचं ! अर्थात, फार छान चित्र जमायचं असं नाही, पण वासरात लंगडी गाय शहाणी म्हणतात ना... तसं ! खरं सांगायचं तर माझे आजोबा ल. श्री. वाकणकर आणि माझी आई यांच्याकडून ती आवड माझ्यात आली. लहानपणी आजोबा मला खूप गोष्टी सांगत. तसेच छान चित्रेही काढून दाखवत असत. माझी आई ही चित्रकलेची शिक्षिका... त्यामुळे मला कायमच चित्रांसाठी प्रोत्साहन मिळत गेले. पण सर्वात जास्त लाडके माझे शाळेतले चित्रकला शिक्षक - बाडीवाले सर. ते सर्वच मुलांना आवडायचे. कल्याणच्या 'न्यू हायस्कूल' शाळेत माझे दहावीपर्यंत शिक्षण झाले. चित्रकलेतला कुठलाही विषय समजावून सांगताना सर इतकी मजेशीर उदाहरणे द्यायचे की आपोआपच आम्हाला त्या विषयाची गोडी लागली.

विरोधी रंग वापरला की चित्र कसं उठावदार दिसतं हे समजावताना ते म्हणायचे की, ''बघा, हा फळा काळा आहे. आणि मी पण काळा! आता मी फळ्याच्या पुढे उभा राहिलो... मी दिसतोय का? नाही! अंधारात मी उभा राहिलो तरी मी दिसणार नाही; कारण गडद रंग एकमेकात मिसळून जातील.'' आणि एखाद्या गोऱ्या मुलाला फळ्यासमोर उभे करून म्हणायचे, ''बघा हा किती उठून दिसतो ते !'' वर्गातल्या उंच आणि बुटक्या मुलीला उभं करून सर प्रपोर्शन शिकवत, तर कधी त्यांना वेगवेगळ्या 'पोझ'मध्ये उभे करून, हातात काठी नाहीतर कधी टोपली देऊन, त्यांचे चित्र काढायला सांगत. अशी बरीच उदाहरणे देऊन ते आम्हाला चित्रकलेची तत्त्वे समजावून सांगत.

आमच्या चित्रकला कक्षात खूप वेगवेगळी, चांगल्या चित्रकारांनी काढलेली चित्रे लावली होती. त्यांचाही नकळत संस्कार होत होता. कधीतरी अशी छान चित्रे मलाही काढता यावीत, अशी इच्छा कायम मनात जागृत असायची. आमचे बालीवाडेसर आम्हाला दिवाळीची भेटकार्डे बनवणे, पणत्यांना रंग लावून सजवणे, गणपतीत आरास करणे, वार्षिक महोत्सवाच्या वेळी स्टेजवर सजावट करणे अशा अनेक गोष्टी हसत खेळत शिकवायचे.

सरांचे घर माझ्या घराच्या थोडे पुढे होते. त्यामुळे घरी जाताना कधीकधी ते मला रस्त्यात भेटत. माझ्या बरोबरीच्या मैत्रिणींनाही त्यांच्याबराबेर जायला आवडे. कारण रस्त्यातून जातानासुद्धा त्यांच्या मनात चित्रच असे ! आणि



। अभिनंदन - सामाजिक कार्यकर्त्या शोभना रानडे (जमनालाल पुरस्कार)।

**प्रायोजक – श्री. अजित भिडे (डायरेक्टर, ॲसेंट हॉस्पिटॅलिटी प्रा. लि.), पुणे**

बोलता बोलता ते आमच्याही मनात उतरे!!

"हे झाड किती वेगळे आहे! त्याची पानं बघा, त्याच्या मागचे झाड आणखी वेगळे आहे... त्याच्या फांद्या बघितल्यास का?" किंवा "या समोरून येणाऱ्या बाईंची साडी बघा... यावरील डिझाइनमध्ये भौमितिक आकारांचा वापर केला आहे!" घराबाहेर वाळत घातलेले रंगीबेरंगी कपडे, झाडे, पाने, रंगांच्या विविध छटा अशी अनेक उदाहरणे देऊन ते रोजच्या जीवनातली कला शोधायला शिकवायचे.

शाळेत असताना चित्रकलेच्या प्रत्येक स्पर्धेत मी भाग घेत असे. वर्गातल्या मुलांना माझं चित्र दाखवलं जायचं तेव्हा मनातून खूप बरं वाटायचं. स्पर्धेत बक्षीस मिळालं तर माईकवर नाव अनाउन्स करायचं आणि मुख्य नोटीसबोर्डवरही सुंदर अक्षरात नाव लिहीत असत. याचं खूप अप्रूप वाटायचं. बक्षीस म्हणून मिळालेली खडूची रंगपेटी, स्केचपेन सेट, एखादे छानसे पुस्तक याचे महत्त्व दुसऱ्या कुठल्याही महागड्या वस्तूपेक्षा मोठे होते.

दहावी पास झाल्यावर 'सर जे. जे. स्कूल ऑफ आर्ट'मध्ये फाईन आर्टला प्रवेश घेतला आणि चित्रकलेचे सखोल शिक्षण घ्यायला सुरुवात केली. त्यानंतर कितीतरी वेगवेळ्या शिक्षकांकडून मोलाचे मार्गदर्शन मिळाले... आणि माझे शिक्षण मला विविध अनुभव देत गेले. माझे गुरू प्रसिद्ध चित्रकार कै. श्री. मधुसूदन केळकर यांनी मला खूपच मोलाचे मार्गदर्शन केले. जलरंगात निसर्गचित्रं करण्याचं प्रोत्साहन मला त्यांच्याकडूनच मिळालं.

बीज चांगले रुजले की योग्य परिस्थितीत त्याचा वृक्ष होतोच. त्यासाठी खूप परिश्रमही घ्यावे लागतात. परंतु ज्यांनी ज्यांनी माझ्या मनात कलेचे सुंदर बीज रुजवले त्यांचे ऋण मी कधीच विसरू शकत नाही. आज तुम्हीही त्याच वयाचे आहात. तुमच्या शाळेतील शिक्षकांकडून होणारे संस्कार तुम्हीही विसरू नका. तुमच्याही मनात कसले ना कसले तरी बीज रुजले असेलच. एक किंवा अनेक कला तुम्हाला आवडत असतील. चित्र, शिल्प, संगीत, नृत्य, नाट्य, लेखन... रुजलेल्या बिजातून कदाचित छोटेसे सुंदर रोपही उगवले असेल... त्याला खतपाणी घालायला विसरू नका. कलेकडे फक्त करिअर या दृष्टीने न बघता त्यातून आनंद मिळवायला शिका. स्वत:ला अभिव्यक्त करायला शिका. तुम्हाला खूप अभ्यास करायचा असेल ना, तर बरोबरीने आवडता छंदही जोपासा. मन आनंदी असेल तर जे काही करू त्यात यश मिळतेच! हा माझा स्वत:चा अनुभव आहे.

मला जसे माझ्या शिक्षकांनी छोट्या-छोट्या गोष्टी शिकवून समृद्ध केले तशाच आणखी काही गोष्टी मला तुम्हाला सांगायला आवडतील. अर्थात, तुमच्या आवडीच्या 'छात्र प्रबोधन' अंकाच्या माध्यमातूनच! आता वारंवार आपली भेट होईलच... लवकर भेटूच... शिवाय तुम्हालाही काही शंका असल्यास त्या जरूर विचारा. त्या शंकांचं निरसन करण्याचा प्रयत्नही केला जाईल.

❋ ❋ **चित्रा वैद्य,** ए-३/ श्रीकुंज सोसायटी, हनुमान मार्ग, विलेपार्ले (पू.),
मुंबई 400057 info@artist.chitra.com

इंद्रधनुचे सात रंग ते मुठीत माझ्या हवे।
चित्रकलेच्या वहीत जमती ते पक्ष्यांचे थवे।।

# माझी आई शिकलेली नव्हती...!

आज मुलांच्या पाठीवरली दफ्तरं
बघितली की,
तीन तपापूर्वी
पत्र्याच्या घरात
जात्यावर दळणारी
माझी आई मला समोरच दिसते...

त्या वेळी,
तिनं स्वत : विणलेली एक पिशवी
एक पाटी,
अन् लेखनीचा तुकडा...
झालंच तर पाटी पुसायला एक फडकं
बस्सं एवढंच माझं दफ्तर...

तरीही,
जात्यावर दळता दळता मी दिसलो
की म्हणायची... गोड गळ्यावर... म्हणायची...

''शाळंची ग घंटा
घणा घणा वाजं...
बंडु बाळाला ग माझ्या
होई दफ्तराचं ओझं...''

आता दफ्तराच्या ओझ्यानं वाकलेली
आजची मुलं पाहताच
तिचं ते गाणं कानात रुंजी घालतं....
अन् मन मानतच नाही की
' माझी आई शिकलेली नव्हती...
माझी आई शिकलेली नव्हती... म्हणे...!'

**प्रभाकर साळेगावकर,** वसंत मल्हार, समता कॉलनी, माजलगाव 431131

पान क्र. २० वरील कोड्याची उत्तरे - अंगरखा/कोट, सुई-दोरा, पतंग, ताक, आंबा



। दिनविशेष : १६ डिसेंबर - राष्ट्रीय पत्रकार दिन।

प्रायोजक –स्टॅटफिल्ड इक्विपमेंट, पिरंगुट, पुणे

# आम्रकूट

**म. वि. कोल्हटकर**

चंदगड तालुक्यामध्ये रानमळा नावाचे गाव आहे. गावाच्या पश्चिमेला भैरोबाची टेकडी आहे. ही टेकडी म्हणजे एक छोटा पर्वतच होय. गावाच्या पूर्वेला ओढा आहे. पावसाळ्यात तो नदीसारखा वाहतो. उन्हाळ्यात तो शुष्क कोरडा असतो. गावकऱ्यांनी 'पाणी अडवा, पाणी जिरवा' ही मोहीम मेहनत घेऊन राबवली आहे. वावरांना ताली (बांध, बंधारा) घातल्या आहेत. गाव संपन्न नसले तरी एकंदरीत खाऊन-पिऊन सुखी आहे.

रानमळा गावात दाजिबा जाधव या नावाचे प्रगतिशील शेतकरी आहेत. दाजिबांना तिघे मुलगे आहेत. थोरले दोघे शेतीच बघतात. सर्वात धाकटा मुलगा चेतन पहिल्यापासून नवनवे प्रयोग करणारा होता. चेतनने कृषिशास्त्रातील एम्.एस्सी. पदवी विशेष प्राविण्यासह संपादन केली होती. शिवाय त्याने 'गाजर गवत' ह्या विषयावर संशोधन करून पी.एचडी. पदवी प्राप्त केली होती.

चेतनला कॅनडा देशातील टोरोंटो विद्यापीठाची स्कॉलरशिप मिळाली होती. चेतनने टोरंटो विद्यापीठातही 'आयसोटोप्स्' या विषयावर प्रबंध लिहून मास्टर्स डिग्री मिळविली होती. चेतनची निवड 'यूनो'मधील इको विभागामध्ये समादेशक म्हणून झाली होती. कामाच्या निमित्ताने चेतन विविध देशांना भेटी देत असे.

उन्हाळा संपला होता. पावसाळा तोंडावर आला होता. अशावेळी दाजिबांना अचानक अर्धांगवायूचा झटका आला. त्यावेळी चेतन न्यूयॉर्कमध्ये हेडक्वार्टर्सला होता. शेतीविषयक परिषदेचे आयोजन तो करीत होता. वडील अर्धांगाने बिछान्याला खिळून आहेत, हे कळताच चेतन मोठ्या मिनतवारीने दोन आठवड्यांची रजा मिळवून आपल्या रानमळा या गावी आला.

चेतनने अगदी मन लावून आपल्या वडिलांची सर्व सेवा स्वत: करण्यास सुरुवात केली. वडिलांना स्पंजिंग करणे, मसाज करणे, बरोबर वेळेवर औषधे देणे, अन्न भरवणे हे तो स्वत: करीत असे. शिवाय दुपारी तो त्यांना अर्धा तास ज्ञानेश्वरी वाचून दाखवीत असे.

या रजेच्या काळात रानमळा गावातील हायस्कूलमध्ये हेडमास्तरांनी चेतनशी बोलून सर्व विद्यार्थ्यांची एका सभा आयोजित केली. शाळेचा एक माजी विद्यार्थी 'यूनो'मध्ये एका उच्च पदावर काम करीत आहे आणि त्याचे भाषण आहे, हे कळल्यावर झाडून सगळी मुले मोठ्या कुतूहलाने आणि आनंदाने सभागृहात जमली.

प्रारंभी हेडमास्तरांनी चेतनची थोडक्यात ओळख करून दिली. नंतर चेतनने बोलण्यास प्रारंभ केला. कोणतेही प्रास्ताविक न करता त्याने थेट विषयास प्रारंभ केला.

चेतन म्हणाला, ''मी एक योजना तुमच्यापुढे मांडणार आहे. ती शाळेच्या चार भिंतीबाहेरची आहे. त्या योजनेला तुम्हा सर्वांचे हात अगदी स्वेच्छेने लागायला हवेत. तुमच्या अभ्यासाची त्यामुळे अजिबात खोटी होणार नाही. सर्वांनी चंग बांधून जंग छेडला तर आपल्या शाळेचंच नव्हे तर गावाचंही नाव जगाच्या नकाशावर झळकू लागणार आहे. मला तुमचे प्रॉमिस हवे आहे. माझी योजना नेमक्या शब्दात सांगतो नीट ऐका.''

मुले कान टवकारून ऐकू लागली. चेतन पुढे बोलू लागला. तो म्हणाला,

''आपले गाव कोकणसीमेवर आहे. इथल्या मातीचा आणि हवेचा मी नीट अभ्यास केला आहे. या मातीचे रहिवासी असलेले एक महत्त्वाचे झाड म्हणजे आम्रवृक्ष. आंबा फळांचा राजा आहे. आंबा म्हणजे अमृताचा कलश. हे फळ माधुर्याच्या नानाछटा दाखवते. काही पेरूचा स्वाद असणारे आंबे असतात, काहींना सफरचंदांची झाक असते, तर काही मोसंबीशी दोस्ती करतात. अशा नाना छटा, नाना चवी असतात आंब्यांच्या.

आपल्या गावाचा रक्षक भैरोबा आहे. भैराबाच्या टेकडीचे मी पूर्वीच मॅपिंग करून ठेवले आहे. या टेकडीवर समान अंतरावर अखंड अशी पंचवीस वर्तुळे आखून घ्यायची. वरून खाली असे एक एक वर्तुळ एकेका इयत्तेच्या ताब्यात राहील. याप्रमाणे पाचवी ते दहावी अशी सहा इयत्तांना सहा वर्तुळे मिळतील.

अगदी वरचे वर्तुळ इयत्ता दहावीचे असेल. या वर्तुळावर सारख्या अंतरावर तीन फूट खोलीचे शोषखड्डे काढायचे आणि त्या खड्ड्यात चंदगड तालुका सोडून इतर सर्व भारतात आढळणाऱ्या सर्व प्रकारच्या आंब्यांची झाडे लावायची. एका खड्ड्यात एकाच प्रकारचे झाड असेल.

क्रमांक दोनचे वर्तुळ इयत्ता नववीच्या ताब्यात असेल. तिथेही समान अंतरावर खड्डे खोदून आणखी वेगळ्या आम्रतरूंची लागवड करायची.

असे क्रमवार उतरत सहा वर्तुळे सहा इयत्तांच्या हाती जातील. बाकीची एकोणीस वर्तुळे सध्या रिक्त राहातील. या वर्तुळांची वाटणी पुन्हा इयत्तावार सावकाश केली जाईल.

आपला भारत देश ज्या अक्षवृत्तांवर आहे त्या अक्षवृत्तावर आफ्रिका, दक्षिण अमेरिका असे कितीतरी... देश येतात. या भूप्रदेशांमध्येही नाना प्रकारच्या आम्रजाती आहेत; ज्या भारतात उपलब्ध नाहीत. उदाहरणार्थ दक्षिण आफ्रिकेत मोगॅम्बो नावाचे जबरदस्त आम्रफळ येते. लोट्यासारखा त्याचा आकार आहे. कोय चपट्या बिट्टीएवढी - अगदी अंगठ्याएवढी असते. बाकी केशरी गोड गोड घट्ट दाट रसाचा खजिना त्यात भरलेला आढळतो.

अशा नाना प्रकारच्या विदेशी आंब्यांचे तरू मी इथे हेडमास्तरांच्या नावाने पाठवीन. ते विशिष्ट क्रमाने एक एक तरू एका एका इयत्तेच्या मुलांच्या जोडीकडे देतील. त्यांनी त्यांच्या वाटणीला आलेल्या शोषखड्ड्यात आपले रोप लावायचे.

प्रत्येक जोडीने आपापल्या तरूची देखभाल उत्तमप्रकारे करायची. सध्या पावसाळा तोंडावर आहे. त्यामुळे सध्या रोपाला फारसे पाणी घालावे लागणार नाही.

आम्रतरूंवरचे संभाव्य रोग आणि त्यावर मातीत मिसळण्याची आणि फवारणी करण्याची औषधे यांचे एक पॅकेज मी तालुका शेतकी अधिकाऱ्याकडे देईन. या प्रकल्पावर मी थेट न्यूयॉर्कहून किंवा असेन तेथून सतत देखरेख ठेवीन.



। दिनविशेष : २३ डिसेंबर - जागतिक किसान दिन।

प्रायोजक – व्ही. व्ही. आर्किटेक्ट, प्रा. लि., पुणे

या कामासाठी प्रारंभी रोपं लावण्यासाठी थोडावेळ द्यावा लागेल. अभ्यास सांभाळून आणि शाळेचा वेळ सोडून रोज अगदी थोडावेळ नंतर पुरेसा होईल. हे झाड स्वावलंबी आहे. ते पाणीसुद्धा फार मागत नाही. त्याची मुळे पाणी शोधून मिळवतात. टेकडीच्या माथ्यावर तुडुंब भरलेले टाके आहे. सगळा उतार असल्याने हे पाणी सहजपणाने मिळू शकते. या पाण्याचा काटकसरीने वापर करायचा. हेही शाळेबाहेरचे शिक्षण आहे. तालुक्याच्या कृषिखात्यामधील एक अधिकारी अधूनमधून प्रकल्पाची पाहणी करेल. भैरोबाचा पर्वत हा आम्रकूट पर्वत आहे. आपली मोहीम 'ऑपरेशन आम्रकूट.' जी सोळा आणे सेंट परसेंट फत्ते झाली पाहिजे. बोला कोण कोण सामील होणार?''

आश्चर्याची गोष्ट म्हणजे सर्व मुले जोरात गरजली 'मीऽ मी मी मीऽ...'

''मुठी वळून हात उंचावून गर्जना करा. रानमळ्यातील हे एक रोल मॉडेल आम्ही निर्माण करणारच,'' चेतन म्हणाला.

मुलांनी मुठी वळल्या. हात उंचावले आणि 'करेंगे, करके रहेंगे' अशी गर्जना केली.

चेतनने एकेका वर्गशिक्षकाकडे एकेका इयत्तेचा चार्ज सोपवला. त्यांना कालबद्ध कार्यक्रम दिला. शिक्षकांनी आपापल्या टीमवर देखरेख करायची असे ठरले.

टेकडीवर वर्तुळे उमटली. पहिला शोषखड्डा चेतनने खणला. मग रविवारच्या दिवशी वानरसेना कामाला लागली. चेतनने इंटरनेटवर आधी भारतातल्या एकएका

राज्यातील वैशिष्ट्यपूर्ण जातीच्या आंब्याच्या कल्चर केलेल्या कोयी मागवल्या.

मग एकएका खड्ड्याचे भाग्य उदयाला येऊ लागले. चेतन आपली रजा संपल्याने न्यूयॉर्कला परतला होता. पण तिथून चेतनची प्रत्येक दिवशी देखरेख सुरू होती.

दिवस पावसाच्या प्रारंभाचे होते. त्यामुळे रोपांना वरचेवर पाणी घालण्याचा प्रश्न नव्हता.

परदेशातूनही एक एक नमुने येऊ लागले. तसतसे मुलांचे थ्रिल वाढत गेले. आज काय कुरिअरने ब्राझिल देशातून पार्सल आले. उद्या नायजेरियातून, परवा टांगानिकातून! या परदेशी पाहुण्यांची त्यांच्या त्यांच्या वर्तुळात सोय लावण्यात आणि तिथे त्या त्या झाडाची पाटी लावण्यात मुले गर्क झाली.

हा परदेशी पाहुणा थेट आपल्या घरी राहण्यास आला, असेच प्रत्येक मुलाला वाटू लागले. त्या पाहुण्याची सरबराई मुले मनापासून करू लागली.

प्रत्येक रोप म्हणजे कुतूहलाचा विषय होता. प्रत्येक झाडाची अवतीर्ण होण्याची तऱ्हा निराळी-नखरे निराळे होते. अगदी कोयीच्या मध्यातून देठ फुटला आणि देठातून पान फुटले की त्या त्या पालकजोडीला अत्यानंद होऊ लागला.

रोज दर्शन घेऊन आल्याशिवाय मुलांना चैन पडेना. आपल्या मुलाचे बालपण, वयात येणे, तरुणपण हा आईवडिलांना एक अपूर्व सोहळा वाटतो. मुलांना आपापल्या रोपाबद्दल असेच वात्सल्य वाटत राहिले...

एक विशाल आंतरराष्ट्रीय संमेलन त्या टेकडीवर बहरले. रोपे आभाळाकडे पाहात माना उंचावू लागली. आभाळाच्या रोखाने वाढू लागली...

आता त्या रोपांना मोहोर कसा येतो, फळांचा आकार काय असेल, पालटत जाणाऱ्या रंगछटा कोणत्या असतील आणि मुख्य म्हणजे एकेकाच्या चवीचा नखरा काय असेल, तो चाखण्यासाठी मुले उत्सुक होत गेली. काहींना झाडांची गोड सुगंधी स्वप्ने पडू लागली...

दहावी पास होऊन एकेका वर्गातील मुले शाळेतून बाहेर पडत होती. पुढील शिक्षणासाठी शहरात जात होती. त्यांच्या आठवणी आम्रकूट पर्वताशी रेंगाळत राहिल्या. जुन्या पुराण्या मित्राला भेटण्याच्या ओढीने दूर बाहेर गेलेली मुले येत-जात राहिली.

आम्रवृक्षांचा पसारा वाढत गेला आणि रानमळा गावाचे नाव दूरवर पसरत गेले...

❋ ❋

**– म. वि. कोल्हटकर**
१६, जीवनछाया कॉलनी,
सिव्हिल हॉस्पिटलसमोर,
सातारा 415001

प्रायोजक ओळीतील 'अभिनंदन' या सदरातील मान्यवरांच्या कार्याविषयी जाणून घ्या.

## उदार दृष्टिकोन

पाटणा स्टेशनवरून ट्रेन सुटणार होती. एक मिशीधारी व्यक्ती सर्वसामान्य डब्यात चढली. त्या डब्यात ५-६ विद्यार्थी गप्पा मारत असताना त्या मिशीधारी व्यक्तीची टर उडवत होते; पण ती व्यक्ती गप्प बसून होती.

एवढ्यातच तिकीट चेकर आला. सगळे गप्प बसले. त्या विद्यार्थ्यांजवळ तिकिटे नव्हती. 'विना तिकीट प्रवास करायला लाज नाही वाटत?' आणखीही अभद्र भाषेत तो त्यांना दरडावू लागला. मिशीवाल्या व्यक्तीने विद्यार्थ्यांच्या तिकिटाचे आणि दंडाचे पैसे तिकीट चेकरला दिले आणि ती व्यक्ती म्हणाली, ''कृपा करून विद्यार्थ्यांसाठी असली अभद्र भाषा वापरू नका.''

ते विद्यार्थी आणि डब्यातले इतर प्रवासी ते औदार्य आणि सालसपणा पाहून चकित झाले. मुगल सराई स्टेशन आले आणि ती व्यक्ती उतरू लागली. डब्याबाहेर गर्दी जमली होती आणि त्या व्यक्तीला पाहून गर्जना उठली, ''डॉ. राजेंद्र प्रसाद जिंदाबाद-जिंदाबाद.''

सगळा विद्यार्थिगण खजिल झाला. त्यांना आपल्या कृत्याची लाज वाटली. त्यांचे पश्चात्तापी चेहरे पाहून राजेंद्र बाबू म्हणाले, ''वाईट वाटून घेऊ नका. हे वयच असं असतं; पण तुम्ही ही शक्ती देशहितासाठी वापरा, ते तुम्हाला जास्त शोभून दिसेल.'' विद्यार्थी नतमस्तक झाले आणि त्यांनी देशसेवेची शपथ घेतली.

**संकलन – केशव फडणीस**



। अभिनंदन - ज्येष्ठ संशोधक प्रा. महेंद्र अगरवाल (फिरोदिया फाउंडेशन जीवनगौरव पुरस्कार) ।
**प्रायोजक – श्री. चिंतामणी बने, डोंबिवली**







# दिवाळी अंक २०११: समृद्ध करणारे भांडार

'छात्र प्रबोधन'चा दिवाळी अंक वाचूनही झाला असेल. कसा वाटला अंक? त्यातलं काय आवडलं, काय नाही, काय समजायला कठीण होतं याचाही आत्तापर्यंत काही लेखाजोखा मनात तयार असेल. याविषयी चर्चा करणं, मत मांडणं, वाचण्यातला, कलाकृती बनवण्यातला आनंद मिळवणं हे तर महत्त्वाचं आहेच. पण फक्त एवढ्यावरच थांबायचं नाहीये आपल्याला. विचारशक्ती, सर्जनशीलता, सादरीकरणक्षमता म्हणजे एकूणच व्यक्तिमत्त्व विकसनासाठी 'छात्र प्रबोधन'चा उपयोग करून आपण काय काय करू शकू, असा कधी विचार तुम्ही केलाय का? केवळ वाचनाची मर्यादा न घालता अजून कशाकशासाठी यातल्या साहित्याचा आपण वापर करू शकू? विचार करायला तर सुरुवात करा. मग ही यादी नक्कीच वाढत जाईल. मला वाटतं स्वत:तल्या क्षमता ताणण्याची, काही वेगळं करून बघण्याची, 'काही वेगळं, हटके सुचणं' ही पहिली पायरी आहे. काहीतरी करण्यासाठी भरपूर गोष्टी आपल्याला सुचल्या तर पाहिजेत ! बरोबर ना? आताचा दिवाळी अंक समोर ठेवून यातल्या अशाच काही हटके/सर्जनशील कल्पना तुम्हाला सांगते. तुम्ही याचा तुमच्या स्नेहसंमेलनातही उपयोग करू शकाल. आणि त्यामुळे सर्जनशीलता वाढण्यासाठी, व्यक्तिमत्त्व विकसनासाठी याचा उपयोग होईल.

दिवाळी अंकातल्या कथांपासून सुरुवात करूयात? 'प्रवास' ही कथा त्यातल्या वेगळ्या धाटणी-मांडणीमुळे सगळ्यांना भावली असेल, हो ना? या कथेची मांडणी बदलून ती आपल्याला लिहिता येईल का? म्हणजे हा गव्हाचा दाणाच आपल्याशी बोलतोय, त्याचा प्रवास सांगतोय असं आत्मकथन लिहायचा प्रयत्न करता येईल का? किंवा या 'प्रवासा'वर एखादी छान नाटुकली/संगीतिका करता येऊ शकेल का? दाणा, कणसं, शेतकरी, वारा, पाऊस, जमीन, बैल - पात्र बघा किती आहेत ! संगीतिकेसाठी स्वत: ४-४ ओळी रचणं किंवा मान्यवर कवींच्या कविता वापरून (ज्या भरपूर प्रमाणात तुम्हाला सहज उपलब्ध होऊ शकतील) नाटक उभं करणं - असं करता येईल का? बघा विचार करून. 'पेनडेक' किंवा 'शिकस्त' या शास्त्रीय माहितीवर आधरित कथा. यातलं विज्ञान अजून खोलवर जाणून घेता येईल का? ग्राफीन, विशिष्ट किरणांचा मारा, त्यात होणारे बदल जाणून घेता येतील का? 'पेनडेक'बद्दल अजून माहिती मिळवून या माहितीच्याआधारे एखादा 'स्लाइड शो' बनवता येईल का? ज्यायोगे 'पेनडेक'ची माहिती सगळ्यांना होईल. पेनडेकची शास्त्रीय/खरी माहिती मिळवून कथेसाठी नीलिमाताईंनी कुठं स्वातंत्र्य घेतलंय, असं काही पाहता येईल का? हे अवघड जरूर आहे. पण असा विचार करायला काय हरकत आहे? तुम्ही लहान मुलांची चित्र-गोष्टींची पुस्तकं पाहिली असतील. प्रत्येक पानावर मोठ चित्रं आणि खाली ४-६ ओळींमधून कथा पुढं नेली जाते. तशी 'चित्र-गोष्ट' 'दोस्त'च्या बाबतीत तयार होऊ शकेल का? यासाठी काय करावं लागेल? कथा वाचल्यावर त्यातली कुठली 'चित्रं' तुमच्या डोळ्यांसमोर उभी राहातात, कुठला भाग खाली वाक्यांमधून द्यावा लागेल, कुठला भाग वगळावा लागेल, याचा विचार करावा लागेल. चित्रांचा क्रम ठरवावा लागेल. चित्रांत तोच तो पणा येत नाहीये ना, पुरेशी स्वतंत्र-वेगळी-कथेला पुढं नेणारी ही चित्रं आहेत ना, याचा सतत विचार करावा लागेल. 'पहिल्या चहा'सारखा पहिला प्रवास, पहिलं भाषण, पहिलं बक्षीस अशा वेगवेगळ्या विषयांवरही

असे कथा-ललित प्रकल्प करायला हरकत नाही !

'शब्दफुले अक्षरली'सारख्या लेखातून आलेल्या कवितांच्या काही ओळी वाचून त्यांच्या मूळ पूर्ण कविता मिळवायचा प्रयत्न करायला हवा. तुम्हाला या व्यतिरिक्त सापडतील अशा 'फुलां'च्या कवितांचं संकलन करत त्याची काही मांडणी करणं (संहिता लिहिणं) आपल्याला या निमित्ताने शिकता येईल. संकलित कविता एखाद्या सूत्रात गुंफून त्याचेही सादरीकरण करता येईल.

'उजळती वाट' ही लेखमाला आता दर अंकात येणार आहे. दिवाळी अंकातल्या या प्रास्ताविक लेखातील व्रतांनुसार तुमची दैनंदिनी आठवून बघा. आपल्या आहार-विहाराच्या काही नोंदी या निमित्ताने करून ठेवता येतायत का पाहा. लेखमालेतील पुढचे लेख येतील त्याप्रमाणे या नोंदींशी तुम्हाला तुलना करता येईल. तुमच्या वैयक्तिक नोंदी आणि या लेखांतील नोंदी यांबद्दल तुमचं मन तुम्हाला काय सांगतंय इकडेही लक्ष द्या. मित्रमैणींशी याबाबतीत जरूर बोला. ही व्रतं तुम्हाला महत्त्वाची वाटतात का? का तुम्हाला काही वेगळं म्हणायचंय?

'माझं प्रेम माझ्या भाषेवर' सारखं खरंच १ तास मराठीतून बोलण्याचा प्रयत्न करून पाहिलात का? त्यातल्या किती शब्दांना पर्याय सुचले, किती शब्द तसेच ठेवावेत असं वाटलं? आत्ताचे दिवस स्नेहसंमेलनाचे, क्रीडामहोत्सवाचे ! याविषयी चर्चा /प्रश्नोत्तरे करतानाही ही अट आपण अशीच ठेवूया का? रुळलेल्या इंग्रजी शब्दांना अर्थवाही मराठी प्रतिशब्द बनवण्याचा प्रयोग करून पाहता येईल का?

अंकातल्या कविता चाली लावून म्हणण्याबरोबरच अंकात आलेल्या ढोबळ विषयांवर (उदा. बालपण, प्रगती, दिवाळी इ.) स्वतंत्र कविता करता येईल का? 'डबेवाल्याच्या पोरा'सारख्या आपल्या आसपासच्या अशाच एखाद्या व्यक्तिरेखेबद्दल आपल्याला कवितेतून/ गद्य उताऱ्यातून मांडणी करता येईल का?

तुम्ही पाहिलेल्या कुठल्या चित्रपटांमधून स्टंट दृश्ये होती, आठवून पाहा. त्याची यादी करा. त्यात कुठल्या क्लृप्त्यांचा वापर केला असेल असं तुम्हाला वाटतंय? कल्पना करा यापैकी एखादं दृश्य तुम्हाला स्नेहसंमेलनात स्टेजवर करायचं आहे. त्यासाठी काय कल्पना सुचतायत? त्यासाठीचं नेपथ्य, प्रकाशयोजना कशी कराल? विज्ञान गणितातल्या स्फुट कृतिपर लेखांमधून तुमच्या मेंदूला भरपूर व्यायाम कसा मिळेल याचा बर्वेसर, नचिकेत, अमेय यांनी विचार केलाय. या व्यायामासाठी तुम्ही तयार ना? पाठ्यपुस्तकातल्याही अशाच वेगवेगळ्या गमतीजमती शोधायला, त्यावर विचार करायला या निमित्ताने शिकता येईल.

या सुट्टीत तुम्ही ट्रेकला गेला असाल, नातेवाईकांकडे गेला असाल, सहलीला गेला असाल. तुमच्याबरोबर असलेल्या एखाद्या वस्तूचे 'सॅक'सारखे आत्मवृत्त तुम्ही लिहू शकाल का? किंवा तुम्ही सोडून तुमच्या बरोबरच्या लोकांपैकी (नातेवाईक-मित्रमैत्रिणी-सर कुणीही) कुणाच्या भूमिकेत शिरून तुम्ही सहलीचे वर्णन करू शकाल का?

या दिवाळी अंकातली जाहिरतीची पानं सोडून इतर पानांखालच्या ओळी कुणाच्या आहेत; ओळखता आलं का? त्या कवीच्या ओळी कशासाठी दिल्या असतील बरं अंकात? त्या ओळींवर आधारित, त्यांना एका सूत्रात बांधून त्यावर काही सादरीकरण करता येईल, संहिता लिहिता येईल का, रसग्रहण करता येईल का? करा बरं विचार !

मला माहितेय एकदा विचार करायला लागलात की या काही कल्पनांच्या आधारे तुम्हालाही एक से एक कल्पना सुचणार आहेत. त्या सुरुवातीला फक्त नोंदवून ठेवा. मग रिकामा वेळ असेल तेव्हा, सुट्ट्यांमध्ये कुठल्याही २-३ कल्पनांवर तुम्ही कार्यवाही करायला हवी, बरोबर ना?

तुम्हाला कळवताना खूप आनंद होतोय, उत्साह वाटतोय की यावर्षी मराठी, ग्रामीण, इंग्रजी, युवोन्मेष, बोलका अंक आणि pdf CD हे सर्व अंक महाराष्ट्रभर ४२,००० घरांमधून पोचले आहेत. मराठी अंकांबरोबरच इतर अंकही तुमच्या वाचनात आले असतील. त्यावरही तुम्ही अशाच कल्पना काढू शकाल आणि स्वत:ला संपन्न करू शकाल.

❋ ❋

**– जयश्री काटीकर**

jayakatikar@gmail.com



हे मासिक ज्ञान प्रबोधिनी या संस्थेच्या मालकीचे असून मुद्रक, प्रकाशक व संपादक श्री. महेन्द्र सेठिया यांनी राष्ट्रीय सौर १० अग्रहायण, शके १९३३, १ डिसेंबर २०११ या दिवशी बालोद्यान प्रेस, नातूबाग, शुक्रवार पेठ, पुणे-२ येथे छापून, ज्ञान प्रबोधिनी, ५१०, सदाशिव पेठ, पुणे - ३० येथून प्रसिद्ध केले.

# लक्षात आहे ना! सहभागी होताय ना?

## ‘छात्र प्रबोधन’तर्फे राज्यस्तरीय नावीन्यपूर्ण सांघिक स्पर्धा/उपक्रम

### ‘सृजनाला पंख नवे’

**सादरीकरण स्पर्धा**

छात्र प्रबोधनच्या वर्ष ११-१२ (इ.स.२०१०-११) मधील अंकांमधल्या साहित्यावर आधारित नृत्य, नाट्य, संगीत, अभिवाचन इ. द्वारा सादरीकरण स्पर्धा.

सादरीकण ४० ते ५० मिनिटांचे असावे. इ. ५ वी ते १०वीतील १० ते १५ जणांचा सहभाग आवश्यक. परीक्षण जवळपासच्या गावात/शाळेत सीडीद्वारा केले जाईल. **३१ डिसेंबर २०११** पर्यंत **रु. १००** पाठवून नावनोंदणी करावी. स्पर्धेचा कालावधी-**१ ते १५ फेब्रु. २०१२**

### ‘तुम्हीच संपादक व्हा !’

**हस्तलिखित स्पर्धा**

✻ ५० पृष्ठसंख्येचे मराठी हस्तलिखित अपेक्षित
✻ इ. ७ वी ते १० वीतील ५ ते १० जणांचा सहभाग आवश्यक
✻ विषयांचे बंधन नाही, पण कथा, कविता, प्रवास वर्णन, मुलाखत, पुस्तक परिचय, संस्थापरिचय इ. प्रकारांचा समावेश आवश्यक
✻ संकलित साहित्य १० पानांपेक्षा जास्त नको. ✻ रु. २५/- रोख/डी. डीद्वारा पाठवून **३१ डिसेंबर २०११** पर्यंत नोंदणी करावी. हस्तलिखिते पाठविण्याचा अंतिम **दि. ३१ जानेवारी २०१२**

**वरील स्पर्धांमध्ये शाळेद्वारा वा स्वतंत्र गटाद्वारे सहभागी होता येईल. दोन्ही स्पर्धांसाठी बक्षिसे पुढीलप्रमाणे प्रथम क्रमांक रु. ७०० द्वितीय क्रमांक रु. ५०० व तृतीय क्रमांक रु. ४०० (सर्व बक्षिसे पुस्तक रूपाने पाठविली जातील.)**

## राज्यस्तरीय प्रकल्पस्पर्धा

विज्ञान, सामाजिक शास्त्रे, भाषा या विषयातील संशोधनात्मक/सर्वेक्षणात्मक/रसग्रहणात्मक प्रकल्पांची स्पर्धा
✻ ८ वी ते १० वीतील ३ ते ५ जणांचा गट आवश्यक. ✻ ३१ डिसेंबरपूर्वी रु. १००/- भरून नावनोंदणी करावी.
✻ प्रकल्पांचे विषय, नियम व अन्य तपशील संकेतस्थळावर पाहावेत. ✻ प्रकल्पवृत्त २० जाने., २०१२ पर्यंत सादर करावे.

**अधिक माहितीसाठी मुख्य कार्यालयाशी अथवा www.chhatraprabodhan.org या संकेतस्थळावर सपर्क साधावा.**

---

प्रत्येक घरी हवीच !

ज्ञान प्रबोधिनीद्वारा प्रकाशित **दिनदर्शिका**
‘राष्ट्रीय सौर - चांद्र - ग्रेगोरियन’ असा तिहेरी संयोग
२४ सेमी × ३६ सेमी आकार, दुरंगी छपाई, प्रबोधिनीच्या विविध विभागांची माहिती, स्वामी विवेकानंदांचे विचार, दिनविशेष, सुट्ट्या इ. वैशिष्ट्यांसह आकर्षक व उपयुक्त **दिनदर्शिका** !
**मूल्य रु. १५/–** (पोस्टाने पाठविण्यासाठी रु. १०/– जादा.) **१५ डिसेंबरनंतर उपलब्ध !**

आजच खरेदी करा.

---

**अवश्य वाचा**

## ललित लेखांचे संग्रह

**आवृत्ती दुसरी**

**अलगुज**
**पृष्ठसंख्या : ८०**
**किंमत : ₹ ५०/–**




**संपादन : वर्षा कुलकर्णी, शिल्पा कुलकर्णी**

‘छात्र प्रबोधन’च्या अंकांमधील खास कुमारांसाठी, निवडक ललित लेखांचे संग्रह म्हणजे ‘छात्र प्रबोधन’द्वारा प्रकाशित ही पुस्तके! प्रवीण दवणे, मल्हार अरणकल्ले, मधु मंगेश कर्णिक, प्रकाश संत, मंगला गोडबोले यांसारख्या मान्यवर लेखकांचे ललित लेख या दोन्ही संग्रहात समाविष्ट केले आहेत. ललित लेखांमधले अनुभव खरंतर खूप साधे; पण तितक्याच समर्थपणे ते मांडण्याची हातोटी मात्र लेखकांची. ललित साहित्याचे अनुभवपर लेखन, प्रवासवर्णन, निसर्गवर्णन असे सर्व प्रकार येथे आहेत. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या वाचनाला वेगळीच दृष्टी मिळेल आणि पुढे ललित लेखन करण्यासाठीही ते मार्गदर्शक ठरतील. २००५ नंतरच्या निवडक लेखांचा दुसऱ्या आवृत्तीत समावेश.

**केवड्याचं पान**
**पृष्ठसंख्या : ८०**
**किंमत : ₹ ५०/–**




**लवकरच ‘बकुळफुले’ हा तिसरा ललित लेखसंग्रह प्रकाशित होतोय.**

**सौर अग्रहायण, शके १९३३/ डिसेंबर २०११, पंजीकृत नियतकालिक** (Registered Newspaper)
**पंजीकरण क्रमांक** (RNI NO.) MAHMAR/2000/5636 **घोषणापत्र क्रमांक :** (PHM/SR/201/VIII/2001)
L-2/RNP/PNW/M/94/2009-2011, **Posted at S.P. Post Office On 1st of Every Month.**
**तिकिटाशिवाय पाठविण्याचा परवाना क्रमांक** License to post without prepayment of postage LWP No. L-172

# नियम पाळावे...

नियम पाळावे जरि म्हणशिल योगी व्हावे ।।ध्रु.।।
रसनेचा जो अंकित झाला
समूळ निद्रेला जो विकला,
तो नर योगाभ्यासा मुकला
असे समजावे ।।१।। जरि म्हणशिल योगी व्हावे...

रात्री निद्रा परिमित घ्यावी,
भोजनातही मिती असावी,
शब्दवल्गना बहु न करावी
साधक जीवे ।।२।। जरि म्हणशिल योगी व्हावे...

या परि सकलाहार-विहारी
नियमित व्हावे मनि अवधारी
निजरूपोन्मुख होउनि अंतरी
चित्त मग धावे ।।३।। जरि म्हणशिल योगी व्हावे...

**सौर दिनदर्शिका शके १९३३**

| डिसेंबर २०११ / | | अग्रहायण पौष |
|---|---|---|
| गु. | 1 | १० |
| शु. | 2 | ११ |
| श. | 3 | १२ |
| र. | 4 | १३ |
| सो. | 5 | १४ |
| मं. | 6 | १५ |
| बु. | 7 | १६ |
| गु. | 8 | १७ |
| शु. | 9 | १८ |
| श. | 10 | १९ |
| र. | 11 | २० |
| सो. | 12 | २१ |
| मं. | 13 | २२ |
| बुं. | 14 | २३ |
| गु. | 15 | २४ |
| शु. | 16 | २५ |
| श. | 17 | २६ |
| र. | 18 | २७ |
| सो. | 19 | २८ |
| मं. | 20 | २९ |
| बु. | 21 | ३० |
| गु. | 22 | पौ. १ |
| शु. | 23 | २ |
| श. | 24 | ३ |
| र. | 25 | ४ |
| सो. | 26 | ५ |
| मं. | 27 | ६ |
| बु. | 28 | ७ |
| गु. | 29 | ८ |
| शु. | 30 | ९ |
| श. | 31 | १० |

**वरील गीत 'छात्र प्रबोधन'च्या संकेतस्थळावर जरूर ऐका.**

**पत्त्यामध्ये वर्गणीचा कालावधी** 12-3/**Dec. 11 असल्यास तुमची वर्गणी संपली आहे, ती त्वरीत भरावी. पत्त्यामध्ये चुका असल्यास तातडीने कळवा.**

**संपर्क पत्ता :**
छात्र प्रबोधन, ज्ञान प्रबोधिनी
५१० सदाशिव पेठ, पुणे 411030
☎ (०२०)२४२०७ १७४/१७९
**www.chhatraprabodhan.org**
**jpchhatra@rediffmail.com**

**या अंकाची किंमत : ₹ १५/–**
**वार्षिक वर्गणी : ₹ १८०/–**
**प्रकाशन दिनांक :**
सौर १० अग्रहायण, शके १९३३
१ डिसेंबर २०११

**प्रिय पोस्टमन,**

हा अंक तुम्ही आमच्या लाडक्या मुलामुलींपर्यंत पोहोचवून फार मोठं काम करता. मुलंमुली या मासिकाची फार आतुरतेने वाट पाहात असतात. मासिक वेळेवर मिळाले नाही अथवा मिळालेच नाही तर ती नाराज होतात, त्यांचा तुमच्यावरचा अन् आमच्यावरचाही विश्वास कमी होतो. असं झालेलं तुम्हालाही निश्चितच आवडणार नाही. हो ना !

तेव्हा हे मासिक खात्रीशीरपणे, विनाविलंब शेजारच्या (⟶) पत्त्यावर द्यावे ही आपुलकीच्या नात्याने विनंती,

तुमचा–संपादक, छात्र प्रबोधन.

**प्रति –**